# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०२१

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### गोंदिया जिल्हयातील ईटीयाडोह मुख्य कालव्यातुन रब्बी पिकासाठी पाणी उपलब्ध करून देण्याबाबत

**(१) २४३ (११-०४-२०२०). श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदिया जिल्हयातील हंगामी रबी पिकासाठी शेतक-यांना ईटीयाडोह धरणाचे पाणी उपलब्ध होणार असल्याची बाब माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ईटीयाडोह मुख्य कालव्यात स्थानिक शेतक-यांनी आंदोलने केली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रबी पिकासाठी मुख्य कालव्यातुन पाणी सोडण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहेत?

**जयंत पाटील (०२-०२-२०२१) :** (१) होय.

(२) होय.

(३) सदर प्रकल्पावर रब्बी हंगाम राबविण्यात येत नाही. इटियाडोह धरणातून दिनांक ९/१/२०२० पासून उन्हाळी हंगामाचे सिंचनाकरीता पाणी सोडण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### अहमदपूर शहरातील मुख्य मार्गावरील बंद अवस्थेतील पथदिवे दुरुस्त करणेबाबत

**(२) ७५७ (०२-०४-२०२०). श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदपूर (जि.लातूर) शहरातून लातूर-नांदेड महामार्ग जात असून या रस्त्यावर ठिकठिकाणी खड्डे पडले आहे तसेच शहरातील प्रमुख मार्गावरील बहुतांश ठिकाणचे पथदिवे बंद असल्याने तेथील नागरिकांची गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अहमदपूर शहरातील आयटीआय महाविद्यालय चौक ते मिरकुले नगरपर्यंत नगरपालिकेचे १०८ पथदिवे आहेत तथापि यातील केवळ ६७ पथदिवे सुरु आहेत उर्वरित पथदिवे बंद आहेत परिणामी रात्रीच्यावेळी अपघात होऊन त्यात अनेक जण जखमी झाल्याचे घटना घडल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणाची चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार बंद पथदिव्यांची दुरुस्ती करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२५-०२-२०२१) :** (१) हे खरे आहे.

- अहमदपूर शहरातील खड्यांसंदर्भात कंत्राटदारास सक्त सूचना देऊनही खड्डे दुरुस्तीचे काम न झाल्यामुळे भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत कंत्राटदाराच्या जबाबदारी, तसेच खर्चाने खड्डे दुरुस्तीसाठी कार्यवाही हाती घेण्यात आली आहे. त्यानुसार अहमदपूर शहरातील खड्डे दुरुस्तीचे काम लवकरात लवकर पूर्ण करण्याचे नियोजन असल्याचे, सार्वजनिक बांधकाम विभागाने अहवाल सादर केला आहे.
- केंद्र शासनाने EESL या कंपनीशी शासनामार्फत एल.ई.डी. पथदिवे बसविण्यासाठी करार केलेला आहे.
- अहमदपूर नगरपरिषद क्षेत्रातील पथदिव्यांची देखभाल व दुरुस्तीची कामे करण्यासाठी त्याच कंपनीमार्फत वार्षिक देखभाल करार (A.M.C.) करण्यात आला असून, सदर कंपनीने कंत्राटदाराची नेमणूक केली आहे. त्यानुसार सद्यस्थितीत पथदिव्यांची नियमित देखभाल दुरुस्तीचे काम करण्यात येत आहे.

(२) हे खरे आहे.

सदर पथदिवे चालू करण्यासाठी EESL कंपनीकडे पाठपुरावा सुरु आहे.

(३) याबाबत EESL कंपनीकडून नविन सब कॉन्ट्रक्टरची नेमणूक करण्यात आलेली आहे. त्यानुसार त्यांच्याकडे यथाशिघ्र पाठपुरावा करुन उर्वरित पथदिवे बसविण्यात येवून त्यांची देखभाल दुरुस्तीचे काम करण्यात येत असल्याबाबत जिल्हाधिकारी, लातूर यांनी अहवाल सादर केला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**जळगांव जिल्हयातील पाचोरा शहरातील आजी-माजी सैनिकांना घरपट्टी माफ करणेबाबत**

**(३) ११५३ (०३-०४-२०२०). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पुरस्कारप्राप्त सैनिक तसेच सैनिकांच्या विधवांना व ग्रामीण भागातील सैनिकांना घरपट्टी माफ करण्याचा निर्णय तत्कालिन शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जळगांव जिल्हयातील पाचोरा शहरात सैन्य दलातून सेवानिवृत्त झालेल्या आजी-माजी सैनिकांची संख्या खूप असून या आजी-माजी सैनिकांना घरपट्टी माफ करणेबाबत नगरपरिषदेत ठरावही संमत करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या संदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १० मार्च, २०१६ व दिनांक १९ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारापासून तत्कालिन मुख्यमंत्री यांना लेखी निवेदन देऊनही कोणतीच कार्यवाही वा निर्णय घेण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०९-०२-२०२१) :** (१), (२), (३) व (४)

- मा.बाळासाहेब ठाकरे माजी सैनिक व त्यांच्या विधवा पत्नीला मालमत्ता कर माफी योजना" या योजनेंतर्गत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कार्यक्षेत्रात वास्तव्य करणाऱ्या सर्व माजी सैनिकांना मालमत्ता करातून सूट देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.
- तसेच ग्रामीण क्षेत्रातील मालमत्तांबाबत, सर्व आजी / माजी सैनिकांना मालमत्ता करातून सूट देण्याचा निर्णय ग्राम विकास विभागाकडून घेण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अकोला जिल्हयातील सुपर स्पेशालिटी रुग्णालयात अपुरे मनुष्यबळ असल्याबाबत

**(४) १२७९ (१३-०४-२०२०). श्री.गोवर्धन मांगीलाल शर्मा (ऊर्फ) लालाजी (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **वैद्‌यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्हयातील सुपर स्पेशालिटी रुग्णालयातील अपुऱ्या मनुष्यबळामुळे या रुग्णालयातील पॅथोलॉजी, बायोकेमिस्ट्री, सूक्ष्म जीवशास्त्र, ॲन्टोमॉलॉजी या चार तपासणी विभागाचा भार सर्वोपचार रुग्णालयातील २३ तंत्रज्ञांवर येत असल्याची बाब दिनांक ६ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे रुग्णसेवा आणखी विस्कळीत होत असल्याचे दिसून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अपुरे मनुष्यबळामुळे रुग्णांना सेवा देण्यास अडचणी निर्माण होऊ नये याकरिता शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अमित विलासराव देशमुख (०४-०२-२०२१) :** (१) प्रधानमंत्री स्वास्थ सुरक्षा योजना अंतर्गत अकोला येथे अतिविशेषोपचार रुग्णालयासाठी ३ टप्प्यात वर्ग-१ ते वर्ग-४ संवर्गात पदे निर्माण करण्याबाबत शासनस्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(२) व (३) सध्या रुग्णालयातील प्रयोगशाळा तंत्रज्ञ व रक्तपेढी तंत्रज्ञ यांची मंजूर २० पदे भरलेली असून त्याअनुषंगाने रुग्णसेवा सुरळीत सुरु आहे.

(४) लागू नाही.

---

## मुंबईतील प्रलंबित पुनर्विकास प्रकल्प मार्गी लावण्याकरिता एक कालबध्द कार्यक्रम आखण्याबाबत

**(५) १७३१ (२०-०३-२०२०). श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील प्रलंबित पुनर्विकास प्रकल्प मार्गी लावण्याकरिता एक कालबध्द कार्यक्रम आखण्याचे आश्वासन तत्कालिन गृहनिर्माण मंत्री यांनी माहे जुलै, २०१९ रोजीच्या अधिवेशनात दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार शासनाने कार्यक्रम तयार केला आहे काय व त्याचे स्वरुप काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. जितेंद्र आव्हाड (२४-०२-२०२१) :** (१) व (२) होय, हे अंशत: खरे आहे

मुंबई शहरातील जीर्ण व धोकादायक उपकरप्राप्त इमारतींचा पुनर्विकास जलद गतीने होण्याकरिता मालक/विकासकांनी अर्धवट अवस्थेत सोडलेले पुनर्विकास प्रकल्प म्हाडातर्फे भूसंपादन करुन पुर्ण करण्याकरिता म्हाड अधिनियम, १९७६ मध्ये सुधारणा करण्याबाबतच्या विधेयकास पावसाळी अधिवेशन-२०२० मध्ये सभागृहाची मान्यता प्राप्त झाली आहे. सदर विधेयकास मा.राज्यपाल महोदयांची मान्यता प्राप्त झाली असून, महामहिम राष्ट्रपती महोदयांकडे पुढील मान्यतेसाठी पाठविण्यात आले आहे. म्हाड अधिनियमात सुधारणा अंतिम झाल्यानंतर मालक/विकासकांनी अर्धवट अवस्थेत सोडलेले प्रकल्प म्हाडातर्फे ताब्यात घेऊन त्यांचा पुनर्विकास करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भ्ावत नाही.

---

## छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ परिसरासाठी तयार करण्यात येणारा स्वतंत्र विकास आराखडा प्रलंबित असल्याबाबत

**(६) १९४८ (२१-०३-२०२०). ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ परिसरासाठी तयार करण्यात येणारा स्वतंत्र विकास आराखडा प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर परिसरासाठी कलम ३२ एमआरटीपी अंतर्गत केवळ अंतरिम विकास आराखडाच घोषित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर अंतरिम विकास आराखड्याची मुदत दिनांक १७ मे, २०१६ रोजी वा त्या सुमारास संपली असल्याने ती वाढवावी अशी विनंती मुंबई इंटरनॅशनल एअरपोर्ट प्रा.लि.ने एमएमआरडीएला दिनांक ११ जुलै, २०१६ रोजी वा त्यासुमारास केली असल्याचे निदर्शनास

आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर मुदतवाढ करण्याची तरतूद नसल्याचे एमएमआरडीएने स्पष्टपणे कळविले असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, त्यामुळे सदर परिसरात कोणताही विकास आराखडा अस्तित्वात नाही, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, विकास आरखडा नसल्याने तेथे सुरु असलेली सर्व बांधकामे अनधिकृत ठरत असून सदर बांधकामांवर कायदेशीर कारवाई करण्याचे आदेश शासन देणार आहे काय,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०२-०३-२०२१) :** (१), (२), (३) व (४),
छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ परिसराच्या अधिसूचीत क्षेत्राकरीता मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून शासनाने दि. १४/०५/२००९ रोजीच्या अधिसूचनेन्वये नियुक्ती केली आहे. सदर अधिसूचित केलेल्या ८०२.०३ हेक्टर क्षेत्रापैकी सुमारे १२५.०३ हेक्टर क्षेत्रावर अतिक्रमणे असल्याने हा भाग वगळून उर्वरीत क्षेत्राकरीता महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३१ मधील तरतूदीनुसार शासनाने भागश: विकास योजना दि.१७/०५/२०१३ रोजी मंजूर केली आहे. सदर भागश: मंजूर विकास योजनेस अंतरिम विकास योजना असे संबोधलेले आहे. मुंबई इंटरनॅशनल एअरपोर्ट प्रा.लि. यांनी अंतरिम विकास आराखडयाची मुदत वाढविण्याबाबत केलेल्या विनंतीनुषंगाने मुदतवाढीची तरतुद अधिनियमात नसल्याचे एमएमआरडीने कळविले आहे. अधिनियमातील तरतुदीनुसार २० वर्षानंतर सदर मंजूर विकास योजना सुधारीत करता येईल. त्यामुळे विकास योजनेची मूदत संपल्याची वस्तुस्थिती नाही.
(५) व (६) अशी बाब नाही.
महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ मधील कलम ३१ च्या तरतुदीनूसार विकास योजना मंजूर झाली असून ती अंमलात आहे. सदर विकास योजना पुन्हा सुधारीत मंजूर होईपर्यंत अंमलात राहते. तसेच मंजूर विकास नियंत्रण नियमावलीनूसार सदर क्षेत्रामध्ये विकास परवानगी असलेल्या बांधकामावर कायदेशीर कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(७) प्रश्न उद्‌भ्‍ावत नाही.

---

**मुंबईतील चिंचपोकळी येथे केस प्रत्यारोपण प्रक्रियेत संबंधित डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे रुग्णाचा झालेला मृत्यू**

**(७) १९९५ (१३-०४-२०२०). ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील चिंचपोकळी येथे केस प्रत्यारोपण प्रक्रियेत संबंधित डॉक्टरांनी हलगर्जीपणा केल्यामुळे श्रावण कुमार चौधरी याचा मृत्यू झाल्याचे तपासणीसाठी नियुक्त केलेल्या समितीच्या अहवालातून निष्पन्न झाल्याचे माहे जानेवारी २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या घटनेला दहा महिने उलटूनही अद्यापपर्यंत दोषींवर गुन्हा दाखल करण्यात

आलेला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत वैद्यकीय तपासणी करण्यासाठी जे.जे. रुग्णालयातील वैद्यकीय अधीक्षक यांच्या अध्यक्षतेखाली नेमण्यात आलेल्या समितीने दिनांक ६ डिसेंबर रोजी तपासणी अहवाल सादर केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तदनुषंगाने अशा प्रकारच्या घटना रोखण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अमित विलासराव देशमुख (०४-०३-२०२१) :** (१) सदर बाब दि.१६.१२.२०१९ रोजी निदर्शनास आली.
(२) चौकशी समितीच्या अहवालानुसार संबंधित डॉ. विकास रामदास हलवाई यांच्या विरोधात साकीनाका पोलीस ठाणे येथे गु.र.क्र.३३/२०२०, कलम ३०४ (अ) भा.दं.वि. अन्वये गुन्हा दि.०७.०१.२०२० रोजी नोंदविण्यात आला आहे.
(३) तपासणीसाठी प्राध्यापक व विभाग प्रमुख (प्लास्टीक सर्जरी विभाग) ज.जि. रुग्णालय यांच्या अध्यक्षतेखाली नेमण्यात आलेल्या चौकशी समितीचा अहवाल दिनांक १६/१२/२०१९ रोजीच्या पत्राने अधिष्ठाता यांना सादर केला आहे.
(४) चौकशी समितीच्या अहवालानुसार रुग्णाचा मृत्यू संबंधित डॉक्टरांच्या हयगयीने व निष्काळजीपणामुळे झाल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांच्यावर दाखल करण्यात आलेल्या गुन्ह्याचा तपास पोलीसांकडून सुरू आहे.
तसेच याबाबत भारतीय आर्युविज्ञान परिषदेने विहित केलेल्या व्यावसायिक शिस्त, शिष्टाचार व प्रमाण संहिता २००२ चे पालन करण्याच्या सूचना सर्व नोंदणीकृत वैद्यकीय व्यवसायिकांना महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेकडून दि.०४.०३.२०२० च्या परिपत्रकाने देण्यात आल्या आहेत.
(५) प्रश्न उद्‌भ्‌ावत नाही.

---

## दक्षिण मुंबईतील जुन्या इमारतींचे सर्वेक्षण करणेबाबत

**(८) २२९२ (०६-०४-२०२०). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.संजय जगताप (पुरंदर) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दक्षिण मुंबईतील विशेषत: पायधुनी, भुलेश्वर, नळबाजार, काळबादेवी, मोहम्मद अली रोड व लगतच्या परिसरातील अनेक इमारती या जुन्या असल्याने या भागात दरवर्षी पावसाळा किंवा त्यापूर्वी दुर्घटना घडून लोकांचे मृत्यू होत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू इमारतींचे सर्वेक्षण करुन बेकायदा बांधकामे तपासून येथील जुन्या इमारतींचा पुनर्विकास करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. जितेंद्र आव्हाड (२६-०२-२०२१) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे
(२) बेकायदा बांधकामाबाबतचे सर्वेक्षण बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत करण्यात येते. दरवर्षी मुंबई शहरातील जुन्या व मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींचे पावसाळ्यापूर्वी सर्वेक्षण मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या तांत्रिक संवर्गाकडून माहे मार्च ते मे या कालावधीत करण्यात येते. त्यानुसार घोषित करण्यात आलेल्या अतिधोकादायक इमारतीमधील भाडेकरु/ रहिवाशांना संक्रमण शिबीरामध्ये स्थलांतरीत करुन, इमारतीची संरचनात्मक दुरुस्ती करण्यात येते किंवा धोकादायक भाग किंवा संपुर्ण इमारत पाडण्यात येते.

मुंबई शहरातील जीर्ण व धोकादायक उपकरप्राप्त इमारतींचा पुनर्विकास जलद गतीने होण्याकरिता मालक/विकासकांनी अर्धवट अवस्थेत सोडलेले पुनर्विकास प्रकल्प म्हाडातर्फे भूसंपादन करुन पुर्ण करण्याकरिता म्हाड अधिनियम, १९७६ मध्ये सुधारणा करण्याबाबतच्या विधेयकास पावसाळी अधिवेशन-२०२० मध्ये सभागृहाची मान्यता प्राप्त झाली आहे. सदर विधेयकास मा.राज्यपाल महोदयांची मान्यता प्राप्त झाली असून, महामहिम राष्ट्रपती महोदयांकडे पुढील मान्यतेसाठी पाठविण्यात आले आहे. म्हाड अधिनियमात सुधारणा अंतिम झाल्यानंतर मालक/विकासकांनी अर्धवट अवस्थेत सोडलेले प्रकल्प म्हाडातर्फे ताब्यात घेऊन त्यांचा पुनर्विकास करण्यात येईल.
(३) प्रश्न उद्‌भ‍ावत नाही.

---

**कोरेगांव (जि.सातारा) तालुक्यातील कोयना कन्हेर आणि धोम प्रकल्पातील प्रकल्पग्रस्तांना नुकसान भरपाई देण्याबाबत**

**(९) २८८६ (१५-०४-२०२०). श्री.महेश शिंदे (कोरेगाव) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरेगांव (जि.सातारा) तालुक्यातील २७ गावे कोयना कन्हेर आणि धोम प्रकल्प पुनर्वसित असून शासन निर्णयानुसार प्रकल्पग्रस्त ग्रामस्थांना शासनाने प्रकल्पग्रस्तांचे दाखले दिले आहेत व त्यांना ५ टक्के नोकरीत आरक्षणही ठेवण्यात आले आहे, परंतु यासर्व प्रकल्पग्रस्तांना शासनामध्ये नोकरी मिळणे अशक्य असल्याने व प्रकल्पग्रस्तांचे वय ४५ वर्षापेक्षा जास्त असल्याने या सर्व प्रकल्पग्रस्तांना शासनाने प्रत्येकी ५ लाख रुपये देण्याचा निर्णय घेतला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कोयना कन्हेर आणि धोम धरण पुनर्वसित झालेले गाव यामधील प्रकल्पग्रस्तांना शासन निर्णयानुसार जमीन देणे बंधनकारक आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सद्य:स्थितीत पुनर्वसन कार्यालयाकडून सोलापूर जिल्ह्यामध्ये प्रकल्पग्रस्तांना पर्यायी जमीन शासनाकडून फक्त अर्धा एकर जमीनी दिल्या जात असल्याने कोरेगावमधील ग्रामस्थांना सोलापूरला अपु-या जमीनीमुळे स्थायीक होणे परवडत नसल्याने मराठवाडी प्रकल्पग्रस्तांना ज्यापध्दतीने एकरी १७ लाख रुपये भरपाई देण्याचा निर्णय शासनाने घेतला,

त्याच प्रमाणे कोयना कन्हेर आणि धोम प्रकल्पग्रस्तांना नुकसान भरपाई देण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. जयंत पाटील (२६-०२-२०२१) :** (१) अशी बाब नाही.

(२) होय.

(३) अशी बाब नाही. प्रकल्पग्रस्त व्यक्तीने पुनर्वसन अधिनियम व शासन निर्णयानुसार विस्थापित खातेदारास संपादनाचे कुटुंब संखेच्या प्रमाणात कमीत कमी ०.४० हे.आर व जास्तीत जास्त २.८० हे.आर पर्यंत जमीनीचे वाटप केले जाते.

(४) प्रश्न उद्‍भवत नाही.

---

**मुंबईतील मौलाना शौकत अली मार्गावरील शितल इस्टेट मधील उपकरप्राप्त जुन्या चाळींच्या पुर्नविकासाबाबत**

**(१०) ३१५४ (२१-०३-२०२०). श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील मौलाना शौकत अली मार्गावरील शितल इस्टेट मधील उपकरप्राप्त जुन्या चाळींचा पुर्नविकासात ना-हरकत प्रमाणपत्र मिळाल्यानंतर मुंबई इमारत दुरुस्ती आणि पुर्नरचना मंडळाने माहे मार्च २०१४ मध्ये वा त्या दरम्यान कलम ९५ (अ) म्हाडा कायदा १९७१ नुसार भाडेकरूंना घरे रिकामी करुन विकासकला देण्याकरिता नोटिस काढली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विकासकाने करारनाम्याप्रमाणे भाडेकरुंना १२ महिन्याचे भाडे पहिल्या महिन्याच्या आधी देण्याची अट असूनही सर्व भाडेकरुंचे भाडे सहा ते दहा महिने विकासकाने दिले नसल्याचे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, फेरीवाले, घर कामगार महिला, हमाल, छोट्या नोकऱ्या, रोजंदारी करणाऱ्या असंघटित भाडेकरुंना संक्रमण काळासाठी लिव्ह लायसन्सने घेतलेल्या जागेचे भाडे देणे अशक्य असल्याने भाडेकरुंनी मुंबई इमारत दुरुस्ती आणि पुर्नरचना मंडळाच्या मुख्य कार्यकारी अधिकऱ्यांना दिनांक २ मार्च, २०१९ रोजी वा त्या सुमारास भाडे मिळण्याबाबत पत्र देऊनही विकासकाने त्यांना भाडे दिलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, त्यासंदर्भात भाडेकरु, विकासक यांच्यामधील दिनांक १९ मार्च, २०१९ रोजी वा त्या सुमारास झालेल्या बैठकीत सुनावणी होऊन विकासकाने माहे एप्रिल, २०१९ अखेर भाडे देण्याचे मान्य करुनही भाडे दिले नसून भाडेकरुंनी दिनांक ३ मे, २०१९ रोजी वा त्या सुमारास उपाध्यक्ष, म्हाडा यांना पत्र देऊनही म्हाडा अधिकाऱ्यांनी भाडेकरुंना भाडे देण्यासंदर्भात कोणतीही कार्यवाही केलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, दिनांक ४ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्या सुमारास भाडेकरुंच्या वतीने लोकप्रतिनीधींनी मुख्य कार्यकारी, मुंबई इमारत दुरुस्ती आणि पुर्नरचना मंडळ यांना ७ दिवसांच्या आत भाडेकरुंना भाडे देण्याची नोटीस दिली तसेच मुंबई इमारत दुरुस्ती आणि

पुर्नरचना मंडळाने दिनांक २८ जून, २०१२ रोजी दिलेल्या ना-हरकत पत्रात ३० महिन्यात घरे बांधून देण्याची अट असतानाही सात वर्षे पाच महिन्यात विकासकाने काम सुरु केलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, विकासकाला दिलेले ना-हरकत प्रमाणपत्र रद्द भाडेकरुंना घरे बांधून देण्यासंदर्भात तसेच संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. जितेंद्र आव्हाड (०४-०२-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

भाडेकरुंच्या दि.२१.०२.२०१९ रोजी प्राप्त झालेल्या पत्रानुसार काही भाडेकरुंना नियमित भाडे मिळत नसल्याची तक्रार मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाकडे प्राप्त झाली आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) होय, हे खरे आहे.

सभापती, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ यांचे समक्ष दि.१८.०६.२०१९ रोजी झालेल्या बैठकीत भाडेकरु/रहिवाश्यांचे भाडे तातडीने चुकते करण्याचे आदेश सभापती महोदयांनी ना-हरकत प्रमाणपत्र धारकांना दिले आहेत.

(५) होय, हे खरे आहे.

तथापि, मुंबई शहरातील जीर्ण व धोकादायक उपकरप्राप्त इमारतींचा पुनर्विकास जलद गतीने होण्याकरिता मालक/विकासकांनी अर्धवट अवस्थेत सोडलेले पुनर्विकास प्रकल्प म्हाडातर्फे भूसंपादन करुन पुर्ण करण्याकरिता म्हाड अधिनियम, १९७६ मध्ये सुधारणा करण्याबाबतच्या विधेयकास पावसाळी अधिवेशन-२०२० मध्ये सभागृहाची मान्यता प्राप्त झाली आहे. सदर विधेयकास मा.राज्यपाल महोदयांची मान्यता प्राप्त झाली असून, महामहिम राष्ट्रपती महोदयांकडे पुढील मान्यतेसाठी पाठविण्यात आले आहे. म्हाड अधिनियमात सुधारणा अंतिम झाल्यानंतर मालक/विकासकांनी अर्धवट अवस्थेत सोडलेले प्रकल्प म्हाडातर्फे ताब्यात घेऊन त्यांचा पुनर्विकास करणे शक्य होईल.

(६) प्रश्न उद्भावत नाही.

(७) प्रश्न उद्भावत नाही.

---

## गोंदिया जिल्हयातील सालकेसा नगरपंचायतीला निष्कासीत करुन आमगाव खु.व सालेकसा नविन प्रभाग तयार करुन त्वरीत निवडणूका घेण्याबाबत

**(११) ३३६० (१६-०४-२०२०). श्री.सहसराम कोरोटे (आमगाव) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदिया जिल्हयातील सालकेसा नगरपंचायतीला निष्कासीत करुन आमगाव खु.व सालेकसा नविन प्रभाग तयार करुन त्वरीत निवडणूका घेण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक १८ डिसेंबर, २०१९ रोजी प्रधान सचिव, ग्रामविकास यांना निवेदन दिले,हे खरे आहे काय ,

(२) असल्यास, निवदेनाच्या अनुषंगाने सदरील प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (२६-०२-२०२१) :** (१) नाही.

(२) स्थानिक लोकप्रतिनिधींचे दि. १८/१२/२०२१९ चे निवेदन ग्रामविकास विभागास प्राप्त झाले नसल्यामुळे कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‍भ‍ावत नाही.

---

**वाशिम जिल्हयातील प्राथमिक आरोग्य केंद्रात वैद्यकीय उपकरणे पुरविण्याबाबत**

**(१२) ३४३८ (१३-०४-२०२०). श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ३०० पेक्षा जास्त प्राथमिक आरोग्य केंद्राना 'मिनी ट्रेड मिल' (व्यायाम सायकल) आणि नेब्युलाशज आदी साहित्य पुरविण्याचा निर्णय शासनाने सात महिन्यापूर्वी घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वाशिम जिल्हयातील प्राथमिक आरोग्य केंद्राना अद्याप सदर साहित्य मिळालेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात माहिती घेवून येथील प्राथमिक आरोग्य केंद्राला सदर साहित्य तात्काळ पुरविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे (१७-०२-२०२१) :** (१) हे अंशत: खरे आहे.

राष्ट्रीय वृद्धापकाळ आरोग्य शुश्रुषा कार्यक्रमांतर्गत ६ जिल्हयातील २८४ प्राथमिक आरोग्य केंद्राना मिनी ट्रेड मिल (व्यायाम यंत्र), इंन्प्रारेड लॅम्प, एक्सरसाईझ बायसिकल आणि नेब्युलायझर इत्यादी साहित्य पुरविण्यात येणार आहे.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) शासन निर्णय दि.१६.०७.२०१९ अन्वये सदर साहित्य खरेदीस प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

---

**मुंबईतील देवनार कब्रस्तानसाठी जागा वाढवून देण्याबाबत**

**(१३) ३६२२ (०५-०४-२०२०). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईच्या (पूर्व) उपनगरातील मानखुर्द, शिवाजी नगर, गोवंडी परिसरातील सुमारे ८ लाख मुस्लिम लोकसंख्येसाठी सद्या देवनारचे कब्रस्तान कार्यरत असून झपाट्याने वाढलेल्या लोकसंख्येमुळे या कब्रस्तानची जागा वाढवावी अशी मागणी स्थानिक नागरिकांनी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, देवनार कब्रस्तानचे आरक्षण हटवून निवासी आरक्षण करण्याचा प्रयत्न एका विकासकाकडून सुरु आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, देवनार कब्रस्तानाचे आरक्षण कायम ठेवून या परिसरातील वाढत्या मुस्लिम समाजाच्या लोकसंख्येमुळे या कब्रस्तानाची जागा वाढविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०३-०२-२०२१) :** (१) व (२) होय,

न.भु.क्र. १(भाग) मौजे देवनार येथे विद्यमान कब्रस्तान असून बृहन्मुंबई महानगरपालिकेने महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २६ अन्वये दि. २७/०५/२०१६ रोजी प्रसिध्द केलेल्या बृहन्मुंबई प्रारूप विकास योजना-२०३४ मध्ये सदर विद्यमान कब्रस्तान लगतचे जमीनीवर "कब्रस्तान (आरएसए ४.८) चे आरक्षण प्रस्तावित करण्यात आले होते. तथापि, प्रस्तावित आरक्षणासंबंधी प्राप्त हरकती/ सूचना मध्ये समाविष्ट मे. स्टार बिल्डर्स प्रा. लि. यांनी महापालिकेस सादर केलेल्या हरकत पत्रानुसार सदर जागेवर यापूर्वीच झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने दि.२५/०२/२०१५ रोजी झोपडपट्टी पुनर्वसन योजनेस मंजूरी दिल्याचे सुनावणीचे वेळी दिसुन आले. त्यानुसार नियोजन समितीने केलेल्या शिफारसीनुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेने कलम ३० अन्वये शासनास सादर करताना सदर प्रस्तावित आरक्षण वगळणेबाबत शिफारस केली. विकास आराखडयास शासनाने दि. ८/०५/२०१८ रोजीचे अधिसूचनेव्दारे मंजूरी देताना सारभूत स्वरुपाचे बदल म्हणुन सदर आरक्षण मंजूरीतुन वगळलेल्या ई.पी.-एम ई १०० मध्ये आहे. विकास योजना मंजूरीतून वगळलेल्या फेरबदलाबाबत वैधानिक कार्यवाही करण्यात आली असून सदर वगळलेल्या भागाच्या मुंबई उपनगर क्षेत्रातील विकास योजनेस कलम ३१ अन्वये शासनाची अंतिम मंजूरी देण्याचा प्रक्रिया सुरू आहे.
(३) देवनार कब्रस्तानपासून अंदाजे २ कि.मी. वर (ईएसए ४.२) रफी नगर मुस्लीम कब्रस्तान स्थित असून त्याचे अंदाजे क्षेत्रफळ १५,४२० चौ.मी. आहे. तसेच रफी नगर कब्रस्तानाला लागून असलेली जमिन कलम २६ अन्वये प्रसिध्द प्रारूप विकास योजनेत ना-विकास विभागात दर्शविली होती. तथापि, उक्त जमीन बृहन्मुंबई महानगरपालिकेने कलम ३० अन्वये विकास योजना शासनास मंजूरीसाठी सादर करताना सुमारे १५७३० चौ.मी. क्षेत्रावर कब्रस्तानासाठी आरक्षण प्रस्तावित केले. महानगरपालिकेच्या विनंतीनुसार सदर क्षेत्रावर विकास योजना मंजूरीतून वगळुन सारभूत स्वरूपाचे बदल (ईपी-एमई-८१) नुसार कब्रस्तान हे आरक्षण प्रस्तावित असून सदर ई.पी. ला अंतिम मंजूरी देण्याची प्रक्रिया सुरू आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### सांगवी (ता. अक्कलकोट, जि. सोलापूर) येथील प्राथमिक उप आरोग्य केंद्र बंद असल्याबाबत

**(१४) ४०४२ (२५-०३-२०२०). श्री.राम सातपुते (माळशिरस) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सांगवी (ता. अक्कलकोट, जि. सोलापूर) येथील प्राथमिक उप आरोग्य केंद्र सध्या बंद

असून आरोग्य केंद्राच्या आजू बाजूचा परिसर प्रचंड झाडा झुडपांनी भरला आहे, तसेच सदर उप आरोग्य केंद्रात एका डॉक्टरची नेमणूक असून ते शिरवळ आरोग्य केंद्रात बसून कारभार पाहत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २००८-०९ मध्ये बांधण्यात आलेले प्रसूती गृह देखील बंद पडले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी जबाबदार असणाऱ्या वैद्यकीय अधिकारी व इतर अधिकारी यांची शासनाने चौकशी करून त्यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे (१५-०२-२०२१) :** (१) हे खरे नाही.

सांगवी (ता.अक्कलकोट, जि. सोलापूर) येथील उपकेंद्र सद्यस्थितीत चालू असून आजूबाजूचा परिसर स्वच्छ करण्यात आला आहे. सदर उपकेंद्रात वैद्यकीय अधिकारी हे पद मंजूर नसून उपकेंद्राच्या आकृतीबंधानुसार आरोग्य सेविका व आरोग्य सेवक ही पदे मंजूर असून भरलेली आहेत.

(२) हे खरे नाही.

सदरचे प्रसतिगृह चालू स्थितीत असून त्या ठिकाणी नियमित प्रसुती होत आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### बोरिवली - पश्चिम, मुंबई सि.टी.एस.क्र.४५९ (पै.) वर असलेले उद्यान व दफनभूमीकरिता आरक्षित असलेले क्षेत्र आरक्षणातून वगळण्याबाबत

**(१५) ४२४५ (०५-०४-२०२०). श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोरिवली - पश्चिम, मुंबई सि.टी.एस.क्र.४५९ (पै.) वर असलेले उद्यान व बगीचा उच्च शिक्षण आणि दफनभूमीकरिता आरक्षित असलेले क्षेत्र आरक्षणातून वगळण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ११ जुलै, २०१७ रोजी वा त्या सुमारास पासून वारंवार सहा.आयुक्त, आर-मध्य, बोरिवली, मुंबई महानगरपालिका, आर-मध्य, बोरिवली ( प.) मुंबई यांच्याकडे लेखी तक्रार केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०२-०३-२०२१) :** (१) दि. ११/०७/२०१७ रोजी महापालिकेकडे पत्र प्राप्त झाले, हे खरे आहे.

(२) बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्राची प्रारूप विकास योजना -२०३४ महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २६ अन्वये ६० दिवसाच्या मुदतीत हरकती/सूचना मागविण्यासाठी दि. २७/०५/२०१६ रोजी महापालिकेने सूचना प्रसिध्द केली होती. त्यानुसार नियोजन समितीने प्राप्त झालेल्या हरकती व सूचनांवर सुनावणी घेऊन योग्य त्या शिफारशीसह महापालिकेस दि.६/०७/२०१७ रोजी अहवाल सादर केला होता. सदर नियोजन

समितीच्या अहवालाच्या अनुषंगाने विकास योजनेत आवश्यक त्या फेरबदलासह महापालिकेने ठराव क्र.३९३ दि. ३१/०७/२०१७ रोजी प्रारूप विकास योजना मंजूर करून दि. २/०८/२०१७ रोजी अंतिम मंजूरीसाठी शासनाकडे सादर केली होती. प्रारूप विकास योजना -२०३४ ला शासनाने कलम ३१(१) अन्वये दि. ८/०५/२०१८ च्या अधिसूचनेव्दारे "परिशिष्ट-ब" मध्ये नमूद केलेल्या वगळलेल्या भागा व्यतिरिक्त मंजूरी दिली आहे. मंजूर विकास योजना-२०३४ नुसार न. भु.क्र. ४५९ मौजे बोरिवली हा भूखंड उद्यान, कॉलेज या सार्वजनिक उद्दीष्टाकरिता आरक्षित आहे. तसेच सदर भूखंड मुस्लिम दफनभुमी या अस्तित्वातील वापराने बाधित आहे. सदर भूखंड १३.४० मी. रुंद विकास योजना रस्त्याने बाधित असून विकास योजना रस्त्याखालील भूभाग वगळलेल्या भागात (EP-RC१२४) समाविष्ट आहे. त्याबाबत मंजूरीची प्रकिया शासनस्तरावर सुरू आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नांदेड शहरातील तरोडा नाका येथील जिल्हा परिषदेच्या मालकीची असल्याचे मान्य करुन सर्वोच न्यायालयाने या जमिनीची मोजणी करुन चतुःसिमा कायम करण्याच्या दिलेल्या आदेशाबाबत**

**(१६) ७०७५ (१६-०४-२०२०). श्री.बालाजी कल्याणकर (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड शहरातील तरोडा नाका येथील ३ एकर २० गुंठे जमिन जिल्हा परिषदेच्या मालकीची असल्याचे मान्य करुन सर्वोच्य न्यायालयाने या जमिनीची मोजणी करुन चतुःसिमा कायम करण्याचे आदेश देण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या आदेशानुसार जमिनीची रितसर मोजणी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, या जिल्हापरिषदेच्या जागेवर टोलजंग इमारतर बांधून कब्जा केला असून वीज वितरण कंपनीकडून विद्युत रोहित्र बसविण्याचे काम माहे फेब्रुवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत चौकशी करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा.पालकमंत्री यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, चौकशीनुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (०१-०२-२०२१) :** (१) नाही, हे खरे नाही.

(२) नाही.

(३) होय, हे खरे आहे.

(४) होय, हे अशत: खरे आहे.

सदर प्रकरणी विधानसभा सदस्य, नांदेड उत्तर यांनी दि.२७.१.२०२० रोजी जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत मा.पालकमंत्री महोदयांच्या निदर्शनास आणून दिली आहे.

(५) नाही.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**दापोली (जि.रत्नागिरी) येथील उपजिल्हा रुग्णालयास निधी उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(१७) ९६७८ (०३-०६-२०२०). श्री.योगेशदादा कदम (दापोली) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दापोली (जि.रत्नागिरी) येथे १०० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय मंजुर असून तेथे अतिदक्षता कक्ष व स्वतंत्र प्रयोगशाळा नसून त्यास निधीची तरतुद नाही, हे खरे आहे काय,

(२) तसेच, दापोली, खेड, मंडणगड, चिपळुण व गुहागर (जि.रत्नागिरी) या पाच तालुक्यांमध्ये एकही रक्त पेढी नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दापोली येथील उपजिल्हा रुग्णालयात अतिदक्षता कक्ष, स्वतंत्र प्रयोगशाळेस निधीची तरतुद करणेसह रक्तपेढी सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे (१२-०२-२०२१) :** (१) हे अंशत: खरे आहे.

दापोली (जि.रत्नागिरी) येथे १०० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय मंजुर आहे. सद्य:स्थितीत ५० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय कार्यरत आहे. निकषानुसार ५० खाटांच्या रुग्णालयास अतिदक्षता कक्ष नाही. सदर रुग्णालयामध्ये स्वतंत्र प्रयोगशाळा आहे.

(२) हे खरे नाही.

दापोली व चिपळुण येथे ब्लड स्टोरेज युनिट आहे.

(३) व (४) दापोली (जि.रत्नागिरी) येथे १०० खाटांचे उपजिल्हा रुग्णालयाचे अंदाजपत्रक व आराखडे प्राप्त करुन घेण्याची कार्यवाही आरोग्य सेवा आयुक्तालय स्तरावर सुरु आहे. १०० खाटांच्या रुग्णालयास अतिदक्षता विभाग उपलब्ध करुन घेण्यात येईल. प्रयोगशाळा सुविधा उपलब्ध आहे.

---

**मुंबई उपनगरातील जोगेश्वरी पूर्व येथील जयंत चाळ, जमुना निवास पुष्प्कर्ण ब्राम्हण वाडी इत्यादी झोपडपट्टयांचे पुनर्वसन करणेबाबत**

**(१८) १०१८१ (२८-०५-२०२०). श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगरातील जोगेश्वरी (पूर्व) येथील पुरातन जोगेश्वरी गुंफा ही भारतीय पुरातन विभागाच्या प्रथम दर्जा श्रेणीत समाविष्ट आहेत व मा. सर्वोच्च न्यायालयाच्या सूचनेनुसार गुंफेच्या कैंद्रबिंदुपासून अनुक्रमे २५, मीटर, १०० मिटर व २०० मीटर पर्यंत कोणत्याही बांधकामास परवानगी नाकारली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या परिसरात ५० वर्षापूर्वीपासून दाटीवाटीच्या लोकवस्त्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या परिक्षेत्रात मा.सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश येण्यापूर्वी खाजगी विकासकामार्फत जयंत चाळ, जमुना निवास पुष्प्कर्ण ब्राम्हण वाडी इत्यादी झोपडपट्टयांचे पुनर्वसन शासनाच्या माध्यमातून सुरु करण्यात आले होते व विकासकांनी सदर घरे निष्कासित ही केली होती मात्र सदर योजना गुंफेच्या कैंद्रबिंदुपासून अनुक्रमे २५ मीटरच्या आत असल्याने या ठिकाणी पुनर्वसनाचे चालू असलेले काम ठप्प झाले आहे आणि तेथील

लोक बेघर झाले आहेत हे वास्तव स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाच्या निदर्शनास आणून दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, पुरातन विभागाबरोबर बैठका होऊन जागेची पाहणी करून देखील याबाबत कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, पुनर्वसनाच्या प्रतीक्षेत असणा-या या झोपडपट्टीधारकांच्या पुनर्वसनबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०९-०२-२०२१) :** (१) मुंबई उपनगरातील जोगेश्वरी गुंफा ही पुरातन वास्तु दि. ३१/०७/२०१२ रोजी प्रकाशित प्रस्तावित हेरीटेज यादीमध्ये श्रेणी-१ मध्ये समाविष्ट आहे. पुरातत्व अधिनियम, १९५८ मधील सुधारित तरतुदीनुसार जोगेयवरी गुंफाच्या १०० मी. संरक्षित परिसर हे प्रतिबंधित क्षेत्र असून त्यामध्ये दुरूस्ती व्यतिरिक्त इतर कोणतेही बांधकाम अनुज्ञेय नाही. तसेच २०० मी. परीसर हे नियमन क्षेत्र असून त्यामध्ये पुरातत्व विभागाच्या परवानगीने बांधकाम अनुज्ञेय आहे. तसेच मुंबई उच्च न्यायालयामधील जनहित याचिका क्र. २४४५/२००४ मध्ये मा. उच्च न्यायालयाने स्थापन केलेल्या समितीने गुंफा साईटच्या ५० मी. क्षेत्रातील जागा संरक्षित करणे आवश्यक असल्याची शिफारस मान्य करून स्थानिक प्राधिकरणाने ५० मी. परीसरातील अतिक्रमणे काढून व त्यांचे टप्पेनिहाय पुनर्वसन करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यापैकी पहिल्या टप्यात २५ मी. परिसरातील अतिक्रमणे काढण्यात आली असून पात्रता धारकांचे पुनर्वसन करण्यात येत आहे.
(२) होय.
(३) (४) (५) व (६) जोगेश्वरी गुंफा परीसरातील २५ मी. परीघात झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणांमार्फत कुठल्याही बांधकामास अथवा निष्कासनास परवानगी देण्यात आलेली नाही. सदर २५ मी. परिघरातील अतिक्रमणे पहिल्या टप्यात काढण्याचे व पुनर्वसनाचे काम सुरू असून मा. उच्च न्यायालयाचे ओदशाप्रमाणे ५० मी. परीसर अतिक्रमणमुक्त करून व विकसित करून पुरातत्व विभागाकडे हस्तांतरित करावयाचे आहे व सदर काम प्रगतीपथावर आहे.

---

**उल्हासनगर (जि.ठाणे) येथील कामगार रुग्णालयाचे पुनर्निर्माण करण्याबाबत**

**(१९) १०५२० (०३-०६-२०२०). श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उल्हासनगर (जि.ठाणे) येथे कामगारासाठी कामगार रुग्णालय असून या रुग्णालयाचे पुनर्निर्माण करण्यासाठी केंद्रसरकार कडून १२० कोटी रुपयाचा निधी उपलब्ध झाला असून सुमारे एका वर्षपूर्वी सदर रुग्णालयाचे भूमिपूजन करण्यांत आले असूनही अद्याप पर्यत सदर रुग्णालयाचे पुनर्निर्माणाचे काम सुरू झाले नसल्याचे दिनांक १८ फेब्रवारी,२०२० रोजी वा सुमारारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या रुग्णालयाच्या इमारतीचे काम तातडीने सुरु न झाल्यास सदर इमारत धोका

दायक इमारतीच्या यादीत समावेश होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ठाणे जिल्हयात फक्त दोनच कामगार रुग्णालय असून त्यांची दुरवस्था झाली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उल्हासनगर शहरामध्ये असलेल्या कामगार रुग्णालयाचे तातडीने पुनर्निर्माण करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे (११-०२-२०२१) :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे आहे.

(४) उल्हासनगर कामगार रुग्णालयाचे पुनर्निर्माण करण्यासाठी राज्य कामगार विमा महामंडळ, नवी दिल्ली यांच्याकडून प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात महाबीजसह विविध नामांकित कंपन्यांकडून निकृष्ट प्रतीच्या बियाणांची विक्री होत असल्याबाबत

**(२०) ११३३१ (११-०७-२०२०). श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), ॲड.आकाश फुंडकर (खामगांव), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.रावसाहेब अंतापूरकर (देगलूर), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा), श्री.रवि राणा (बडनेरा), श्री.संदिप क्षिरसागर (बीड), श्रीमती श्वेता महाले (चिखली), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी), श्री.अनिल बाबर (खानापूर), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.संजय केळकर (ठाणे), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.बबनराव पाचपुते (श्रीगोंदा), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.दादाराव केचे (आर्वी), श्री.नामदेव ससाने (उमरखेड), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्रीमती नमिता मुंदडा (केज), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्रीमती मुक्ता टिळक (कसबापेठ), श्रीमती सीमा महेश हिरे (सीमाताई) (नाशिक पश्चिम), श्री.संभाजी पाटील-निलंगेकर (निलंगा), श्री.बबनराव दत्तात्रय यादव (लोणीकर) (परतूर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत औरंगाबाद, बुलढाणा, बीड, अकोला, भंडारा, वाशिम, हिंगोली, नांदेड, सांगली, अमरावती, वर्धा, यवतमाळ व लातूर या जिल्ह्यांमधील शेतकऱ्यांनी महाबीज तसेच विविध नामांकित कंपन्यांचे खरेदी केलेले सोयाबीन, तूर, मुग, बाजरी इत्यादी पिकांचे बियाणे निकृष्ट प्रतीचे तसेच उगवण क्षमता कमी असलेले असल्यामुळे हजारो शेतकऱ्यांना दुबार पेरणी करावी लागल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू बियाणे उगवले नसल्यामुळे अनेक शेतकऱ्यांनी जिल्हा कृषी अधिकारी तसेच तालुका कृषि अधिकारी यांच्याकडे माहे जून, २०२० मध्ये वा त्यादरम्यान तक्रारी केल्या असून या तक्रारीची पडताळणी तातडीने करण्यासाठी तपासणी पथकाची संख्या वाढवुन तपासणी अहवालाची वाट न पाहता बियाणे बदलून देण्याच्या तसेच नुकसान भरपाई देण्याच्या सूचना मा. कृषी मंत्री यांनी दिल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, निकृष्ट प्रतीच्या बियाण्यांमुळे अनेक शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून मा. कृषी मंत्री यांनी सूचना देऊनही बीड जिल्ह्यामध्ये सोयाबीन पिकाचे पंचनामे अद्याप झाले नसून निकृष्ट दर्जाच्या बियाण्यामुळे कावली वसाड (ता.धामनगाव रेल्वे,जि. अमरावती) या गावातील एका शेतकऱ्यानी आत्महत्या केली असल्याने या प्रकरणी पंचनामे करुन दोषींवर तातडीने कारवाई करण्याची मागणी किसान सभेने दिनांक २२ जून, २०२० रोजी वा त्यासुमारास कृषी मंत्री यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत चौकशी करून निकृष्ट प्रतीच्या बियाण्यांची विक्री करणाऱ्या कंपन्यांचे परवाने रद्द करुन महाबीजमधील संबंधित जबाबदार अधिकारी यांच्यावर कारवाई करण्यासह शेतकऱ्यांना मोफत दर्जेदार बियाणे उपलब्ध करून नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (२६-०२-२०२१) :** (१) अंशत : खरे आहे.

राज्यात सोयाबीन बियाणांच्या उगवणशक्ती कमी असल्याच्या तक्रारी मोठ्या प्रमाणावर प्राप्त झालेल्या आहेत.

तसेच सोयाबीन व्यतिरीक्त तुर, मुग, बाजरी, या पिकांचे बियाणे सदोष असल्याबाबतच्या तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

कावली वासाड, ता.धामणगांव रेल्वे, जि.अमरावती या गावातील मृत शेतकरी श्री.अनिल हरीभाऊ गवई यांची तक्रार सोयाबीन पिकासंबधी नसुन कापूस पिकासंबंधी आहे. त्यानी कापूस या पिकाची अंकूर बीजी-२ या वाणाची लागवड केली असून प्राप्त तक्रारीनुसार तालुका स्तरीय समितीने त्यांची लागवड क्षेत्राची तपासणी केली असून सदर बियाणांची उगवण क्षमता ९५ टक्के आढळून आली असून बियाणात दोष नसल्याचे आढळून आले आहे.

(४) राज्याच्या सोयाबीन उगवणशक्ती कमी असल्याच्या तक्रारीच्या अनुषंगाने नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना बियाणे बदलुन देण्याबाबत अथवा नुकसान भरपाई देण्याबाबत संबंधीत बियाणे कंपन्यांना आदेशीत करण्यात आले आहे.

राज्यात महाबीजने आतापर्यंत एकूण ३०६७ शेतकऱ्यांना मदत दिलेली असून त्यापैकी ५९५ शेतकऱ्यांना ७७७.६० क्विंटल सोयाबीन बियाणे बदलून दिलेले आहे. तसेच २४७२ शेतकऱ्यांना रू. १,९६,६८,३४३/- इतकी रक्कम नुकसान भरपाई म्हणून देण्यात आलेली आहे.

राज्यात खाजगी सोयाबीन बियाणे उत्पादक कंपन्यांनी आता.पर्यंत ४८०३ शेतकऱ्यांना १०६८.५९ क्विंटल बियाणे बदलून दिलेले असून ३७२२ शेतकऱ्यांना रू. २,४६,१०,७३३/- इतकी

रक्कम नुकसान भरपाई म्हणून देण्यात आलेली आहे.

सदोष बियाणे प्रकरणी कंपन्याविरुध्द ८३ फौजदारी गुन्हे विविध पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आलेले आहेत. बियाणे अधिनियम १९६८ मधील तरतूदीनुसार उगवण शक्ती न झालेल्या प्रकरणात दोषी कंपन्यांवर १८३ न्यायालयीन दावे दाखल केले असून अप्रमाणित नमुन्याच्या अनुषंगाने ९८९ न्यायालयीन दावे दाखल करण्यात आलेले आहेत. तसेच सोयाबीन बियाणे उगवण क्षमतेच्या तक्रारींच्या अनुषंगाने आतापर्यंत एकूण २० कंपन्यांचे सोयाबीन बियाणे विक्री परवाने रद्द करण्यात आले आहेत.

(५) विलंब झालेला नाही.

---

**जिंतूर (जि.परभणी) तालुक्यातील अंगणवाडी केद्राना जागा उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(२१) ११६४८ (१४-०९-२०२०). श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिंतूर (जि.परभणी) तालुक्यातील ३१६ अंगणवाडयां पैकी ७१ अंगणवाडयांना स्वतःची इमारत नसल्याचे दिनांक ३ जून,२०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जागे अभावी अंगणवाडी जिल्हा परिषद शाळा, खासगी इमारत, समाज मंदिर व काही ठिकाणी झाडाखाली भरत असल्याचे निदर्शनास आले हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बालकांच्या उज्वल भविष्यासाठी जिंतूर तालुक्यात ज्या अंगणवाडी केंद्रांना जागा उपलब्ध नाही त्यांना जागा उपलब्ध करून इमारत बांधण्यासाठी निधी वितरीत करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) (२३-०२-२०२१) :** (१) (२) व (३) जिंतूर तालुक्यात एकूण ३१६ अंगणवाडी केंद्र कार्यरत आहेत. त्यापैकी स्वत:ची इमारत असलेली २४७ अंगणवाडी केंद्र आहेत. ६९ अंगणवाडी अंगणवाडी केंद्रांना स्वत:ची इमारत उपलब्ध नाही. त्यापैकी ३१ अंगणवाडी केंद्र जिल्हा परिषद शाळेमध्ये, १३ अंगणवाडी केंद्र भाडेतत्वावर व २५ अंगणवाडी केंद्र एकत्र व इतर शासकीय इमारतीमध्ये कार्यान्वित आहेत.

सन २०१९-२० मध्ये जिल्हा वार्षिक योजनेअतंर्गत प्राप्त निधीनुसार एकूण ९ अंगणवाडी बांधकाम मंजूर असुन सदर बांधकाम प्रगती पथावर आहे.

(४) प्रश्न उद्‌भ्‍ावत नाही.

---

**म्हारळ, वरप, काबा (ता. कल्याण, जि.ठाणे) या ग्रामीण भागात आरोग्य केंद्र उभारण्याबाबत**

**(२२) ११७२४ (११-०८-२०२०). श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) म्हराल, वरप आणि काबा (ता. कल्याण, जि.ठाणे) येथे मोठ्या प्रमाणावर नागरीकरण होत असून येथील नागरिकांना उपचारासाठी उल्हासनगर किंवा कल्याण येथे जावे लागत असल्याने येथे आरोग्य केंद्र उभरण्याची मागणी लोकप्रतिनिधीनी मा मुख्यमंत्री आणि पालकमंत्री तसेच ठाणे जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सद्यस्थितीत उदभवलेल्या कोरोना आजारावर उपचार करण्यासाठी कोणतीच

सोयी- सुविधा नसल्यामुळे या ग्रामीण भागातील नागरिकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, ठाणे जिल्हा नियोजन समितीची बैठक होऊन चार महिने झाले असून लोकप्रतिनिधींनी केलेल्या मागणीवर कोणतीही कार्यवाही होत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर मागणीनुसार आरोग्य केंद्र उभारण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राजेश टोपे (१२-०२-२०२१) :** (१) कल्याण तालुक्यातील म्हारळ, वरप व कांबा याठिकाणी प्राथमिक आरोग्य केंद्र सुरु करण्याबाबतची मागणी मा. मुख्यमंत्री महोदय यांना केली आहे, हे खरे आहे. मात्र पालकमंत्री तसेच ठाणे जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत मागणी केली आहे, हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
(४) व (५) कांबा येथे उपकेंद्र कार्यरत असून त्यामार्फत नागरिकांना आरोग्य सेवा पुरविण्यात येतात. तसेच या गावांपासून जवळ खालील शासकीय आरोग्य संस्था कार्यरत आहेत.

उपकेंद्र कांबा- ० कि.मी, प्राथमिक आरोग्य केंद्र दहागांव १० कि.मी, ग्रामीण रुग्णालय, गोवेली-८ कि.मी, उल्हासनगर सेंट्रल हॉस्पिटल नं-३, ५ ते ६ कि.मी, उल्हासनगर सेंट्रल हॉस्पिटल नं-४ (प्रसुती रुग्णालय) ७ ते ८ कि.मी, रुक्मीणीबाई हॉस्पिटल, कल्याण-१६ कि.मी.

---

**मौजे कळगांव (ता. पूर्णा, जि. परभणी) येथील शेतकऱ्यांना भूसंपादनाचा मोबदला देण्याबाबत**

**(२३) ११७९१ (१३-०९-२०२०). श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.रत्नाकर गुट्टे (गंगाखेड) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे कळगांव (ता. पूर्णा, जि. परभणी) येथील गोदावरी नदीवरील डिग्रस उच्च पातळी बंधारा बांधण्याकरिता कळगाव येथील शेतक-यांची जमिनी संपादित करण्यात येऊन त्या बदल्यात संबधित शेतक-यांना सन २०१७-१८ मध्ये अवार्ड मंजूर होऊन मोबदला अदा करण्यात आला त्यापैकी काही शेतक-यांना अद्याप मंजूर झालेला मोबदला मिळाला नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मोबदला अदा करण्याकरिता कार्यकारी अभियंता, विष्णुपुरी प्रकल्प २, नांदेड व त्यांचे इतर सहकारी कर्मचारी संबधित शेतक-यांना लाचेच्या रकमेची मागणी करीत असून ती देण्यास संबधित शेतक-यांनी नकार दिल्याने त्यांची मोजणी चुकीची करुन ४ शेतक-यांची जमिनी ७७ आर. ने कमी करून त्यांचे नुकसान करीत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू प्रकरणी न्याय मिळावा याकरिता संबधित शेतक-यांनी माहे सप्टेंबर, २०१९ व फेब्रूवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान मा. मुख्यमंत्री, मा.जलसंपदा राज्यमंत्री यांचेकडे विनंती अर्ज सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी न्याय चौकशी करुन लाभार्थी शेतक-यांना मोबदला अदा करण्यासह तसेच त्यांना त्यांच्या हक्कापासून वंचित ठेवणा-या संबधित दोषी अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील (२५-०१-२०२१) : (**१) हे अंशत: खरे आहे.

दिग्रस उच्च पातळी बंधा-याच्या बुडीत क्षेत्रासाठी मौजे कळगांव ता. पुर्णा करीता संपादीत करावयाच्या जमिनीच्या खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पध्दतीने करावयाचे भूसपांदन प्रस्तावाच्या अनुषंगाने जिल्हास्तरीय समितीने दिनांक ०१/०३/२०१८ रोजी मंजूर केलेल्या प्रपत्र 'अ' निवाडा मधील एकूण ७७ पैकी ६८ शेतक-यांना मोबदला वाटप होऊन खरेदी खताची कार्यवाही पूर्ण करण्यात आली आहे. उर्वरित ०९ शेतकऱ्यांना त्यांच्या वैयक्तिक कारणामुळे मोबदला वाटप होऊ शकलेला नाही.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्‌भ्‌ावत नाही.

---

**आनंदनगर, (पुणे) सिंहगड रस्त्यावरील राजराम पूल ते फनटाईम सिनेमागृहापर्यंत उभारण्यात येणाऱ्या उड्डाणपुलाच्या कामाबाबत**

**(२४) १२००१ (१८-०९-२०२०). श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.अशोक पवार (शिरुर) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आनंदनगर, (पुणे) सिंहगड रस्त्यावरील राजराम पूल ते फनटाईम सिनेमागृहापर्यंत उभारण्यात येणाऱ्या उड्डाणपुलाचे काम बरेच वर्षे उलटून ही प्रत्यक्षात या कामाची सुरुवात देखील झाली नसल्याने वारंवार वाहतुकीची कोंडी होऊन नागरिकांची गैरसोय होत असल्याचे माहे मे, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याची दुरवस्था झाली असून वारंवार होणारी वाहतुककोंडी, वाहतूक खोळंबल्याने मोठ्या प्रमाणात दुध आणि भाजीपाल्याचा पुरवठा करणाऱ्या आजूबाजूच्या ग्रामीण परिसरातील उत्पादकांची मालवाहू वाहने बाजारात विलंबाने पोहचत असल्याने त्यांचे होणारे नुकसान, तसेच कामावर जाणाऱ्या नोकरदार नागरिक, शाळा-कॉलेज मधील विद्यार्थ्यांना पोहचण्यास होणारा विलंब, वाहने खोळंबुन धुरामुळे मोठ्या प्रमाणात होणारे प्रदूषण व त्यामुळे नागरिकांच्या आरोग्यावर होणारे परिणाम आदींमुळे नागरिक त्रस्त झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करुन राजाराम पूल ते फनटाईम सिनेमागृहापर्यंत उभारण्यात येणाऱ्या उड्डाणपुलाचे काम तात्काळ पुर्ण करुन दुरवस्था झालेल्या रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०२-०२-२०२१) :** (१), (२) व (३)

• सिंहगड रस्त्यावर ट्राफिक सर्व्हे करण्यात आलेला असून गर्दीच्यावेळी वाहनांची मोठ्याप्रमाणवर ये जा होत असल्याने सदरचा रस्ता वाहतुकीसाठी पुरेसा नाही, त्यामुळे वाहनांची कोंडी होत आहे, ही वस्तुस्थिती आहे, असे पुणे महानगरपालिकेने कळविले आहे.

• सदर ठिकाणी होणारी वाहतुक कोंडी कमी होण्याच्या दृष्टीकोणतून राजाराम पूल ते फनटाईम सिनेमागृह दरम्यान उड्डाणपूल बांधण्याचे पुणे महानगरपालिकेचे नियोजन आहे.

• या कामाकरीता दिनांक ०७.०९.२०१९, दिनांक ०९.११.२०१९ व दिनांक ०९.०३.२०२० अशा निविदा काढल्या होत्या. तथापि, प्रथम निविदेमध्ये निविदा धारक प्राप्त न झाल्याने, तसेच उर्वरित निविदात जादा दर प्राप्त झाल्याने याप्रकरणी पुढील कार्यवाही झाली नाही.

• तद्नंतर कोविड-१९ या जागतिक महामारीमुळे याप्रकरणी नव्याने निविदा मागविणे शक्य झाले नाही असे पुणे महानगरपालिकेने कळविले आहे.

• सिंहगड रस्त्यावरील राजाराम पूल ते फनटाईम सिनेमागृह हा रस्ता सद्यस्थितीत सुस्थितीत असून उड्डाणपूलाचे काम लवकरात लवकर सुरु करण्याचे प्रयोजन असल्याचे पुणे महानगरपालिकेने कळविले आहे.

४) प्रश्न उद्‌भ्‍ावत नाही.

---

**हडपसर (जि.पुणे) येथील नाल्यांवरील संरक्षक कठडे बसविण्याबाबत**

**(२५) १२०४७ (०९-०९-२०२०). श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.अशोक पवार (शिरुर) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हडपसर (जि.पुणे) येथील केशवनगर, ससाणेनगर आदी भागातील नाल्यालगत असलेल्या वस्त्यांच्या बाजूने संरक्षक कठडे तुटून धोकादायक झाले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या नाल्यांवर संरक्षक कठड्याअभावी अपघात घडून जीवित व वित्त हानी होण्याचा धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर नाल्यांची शासनाने पाहणी केली आहे काय व त्यानुसार नाल्यांवर संरक्षक कठडे बसविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१८-०२-२०२१) :** (१), (२) व (३)

• सदरहू नाल्याच्या कडेने बहुतांशी ठिकाणी खाजगी मिळकती आहेत.

• त्यातील काही मिळकतींच्या कडेने सिमाभिंती अस्तित्वात आहेत.

• परंतु वस्त्यांच्या कडेने संरक्षक कठडे अस्तित्वात असल्याचे दिसून येत नाही.

• खाजगी मिळकतींच्या सिमाभिंती दोन ठिकाणी पडल्याचे दिसून येते. तथापि, सदरच्या पडलेल्या भिंती खाजगी असल्याने संबंधित मालकाने बांधने आवश्यक असून सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून सदरहू सिमाभिंती तातडीने बांधून घेण्याबाबत संबंधितांना सूचना देण्यात येत असल्याचे पुणे महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्‌भ‍ावत नाही.

---

**दापोली, खेड व मंडणगड (जि.रत्नागिरी ) तालुक्यातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातील किल्ल्यांचा विकास करणेबाबत**

**(२६) १२०८१ (०९-०९-२०२०). श्री.योगेशदादा कदम (दापोली) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दापोली, खेड व मंडणगड (जि.रत्नागिरी) तालुक्यातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातील घेरापालगड (माची), सुमारगड, महिपतगड, रसाळगड, मंडणगड व पन्हाळेदुर्ग या किल्यांच्या विकासासाठी विशेष निधी मिळण्याबाबत मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या किल्ल्याच्या विकासासाठी निधी उपलब्ध करण्याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येणार आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अमित विलासराव देशमुख (०४-०२-२०२१) :** (१) अंशत: खरे आहे.

दि. २०.०१.२०२० च्या पत्रान्वये मा. विधानसभा सद्स्य, श्री. योगेश दादा कदम यांनी या किल्ल्यांच्या विकासासाठी निधी मिळणेबाबत विनंती केली आहे. या किल्ल्यांपैकी रसाळगड व महिपतगड हे किल्ले राज्य संरक्षित स्मारक आहे.

(२) रसाळगड या किल्ल्याच्या संवर्धनाकरीता १२व्या वित्त आयोगानुसार सन २००९-१० अंतर्गत रु.९९.९४ लाख एवढा निधी खर्च करण्यात आला आहे. तसेच मा. मुख्यमंत्री कृती कार्यक्रम आराखडा सन २०११-१२ अंतर्गत टप्पा-२ साठी रु.१.०६ कोटी इतकी रक्कम विकासासाठी कर्च करण्यात आली आहे. तथापि महिपतगड या किल्ल्याचे संवर्धन करण्याकरीता अद्‌याप प्रकल्प राबविण्यात आलेला नाही. याबाबत सहायक संचालक, पुरातत्व विभाग, रत्नागिरी यांना सूचना करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्‌भ‍ावत नाही.

---

**उल्हासनगर (जि.ठाणे) येथे कोरोनाग्रस्त रुग्णांवर उपचार करणारे अत्यावश्यक सेवेतील कर्मचा-याना अपुऱ्या सोयी-सुविधा मिळत असल्याबाबत**

**(२७) १२२२० (१४-०९-२०२०). श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर (जि.ठाणे) येथे कोरोनाग्रस्त रुग्णांवर उपचार करणारे अत्यावश्यक सेवेतील डॉक्टर आणि आरोग्य कर्मचारी हे कोरोना योद्‌धा म्हणून काम करीत असून त्याच्याकडे प्रशासन दुर्लक्ष करीत असल्याचे दिनांक ६ जून २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अत्यावश्यक सेवेतील कर्मचारी यांनी आयुक्त यांची भेट घेण्याकरिता गेले

असता त्यांची भेट घेतली नाही तसेच आरोग्य अधिकारी यांनी या वर कोणताही उपाय न सुचविता टाळाटाळ करीत असल्याने या विरुद्ध आंदोलन करण्याचा इशारा ही दिला होता, हे ही खरे आहे कय,

(३) असल्यास, डॉक्टर, नर्सेस आणि आरोग्य कर्मचारी रहात असलेल्या खोल्याची वीज घालविणे, गरम पाण्याचे गिझर बंद करणे लिफ्ट बंद करणे, निकृष्ट दर्जाचे देणे आदी समस्या असल्याचे निदर्शनास आणून देखिल त्याकडे आरोग्य अधिकारी आणि महानगरपालिका प्रसाशन लक्ष देत नसल्याने कर्मचारी वर्गात नाराजीचे वातावरण निर्माण असून कर्मचारी काम करण्यास तयार होत नसल्याचे निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अत्यावश्यक सेवा देण्या-या कर्मचा-यांना प्रसाशनाच्या वतीने अपुऱ्या सोयी-सुविधा देणाऱ्या कंत्राटदारावर व संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे (१२-०२-२०२१) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३), (४) व (५) हे खरे नाही.

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात कोविड व नॉन कोविड रुग्णालये कार्यरत आहेत. शासकीय प्रसुतीगृह व दवाखाना, उल्हासनगर-४ हे रुग्णालय कोविड रुग्णालय म्हणून कार्यरत आहे. सदर रुग्णालयात शासनाचे डॉक्टर, नर्सेस आणि आरोग्य कर्मचारी यांना शासनामार्फत वेतन व इतर भत्ते अदा करण्यात येतात. तसेच कोविड अंतर्गत अतिरिक्त वैद्यकीय अधिकारी, नर्सेस व वॉर्डबॉय यांची नियुक्ती महानगरपालिकेमार्फत कोविड रुग्णालये, कोविड आरोग्य केंद्र आणि कोविड निगा केंद्रे येथे करण्यात आली आहे. सदर अधिकारी /कर्मचारी यांची निवासाची व्यवस्था महानगरपालिकेने तेथील हॉटेलमध्ये केली होती. तसेच कार्यरत डॉक्टर, नर्सेस आणि आरोग्य कर्मचारी राहत असलेल्या खोल्यांची वीज घालवणे, गरम पाण्याचे गिझर बंद करणे इत्यादी. समस्यांच्या अनुषंगाने कार्यरत अधिकारी व कर्मचारी यांची तक्रार प्राप्त झालेली नाही.

---

## प्रधान मंत्री घरकुल योजना व रमाई घरकुल योजना अंतर्गत मिळणा-या अनुदानात असलेली तफावत

**(२८) १२२२५ (०९-०९-२०२०). श्री.कैलास घाडगे पाटील (उस्मानाबाद), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ग्रामीण व शहरी भागात गरजू नागरीकांसाठी प्रधान मंत्री घरकुल योजना व रमाई घरकुल योजना कार्यरत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेतंर्गत ग्रामीण भागातील घरकुलासाठी प्रती लाभार्थी १ लक्ष ५० हजार व शहरी भागातील घरकुलासाठी प्रती लाभार्थी २ लक्ष ५० हजार एवढे अनुदान अनुज्ञेय आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या योजनेसाठी ग्रामीण भागात व शहरी भागात जवळपास १ लक्ष रुपयाची तफावत असण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, सदर तफावत दूर करून शहरी भागाप्रमाणे ग्रामीण भागातील लाभार्थ्यांनाही २ लक्ष ५० हजार एवढे अनुदान देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?
**श्री. हसन मुश्रीफ (२६-०२-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) सन २०१६-१७ पासून "प्रधानमंत्री आवास योजना- ग्रामीण" ही केंद्र पुरस्कृत योजना राज्यात राबविण्यात येत आहे. सदर योजना केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार राज्यात राबविण्यात येते. याच योजनेच्या धर्तीवर राज्यात रमाई आवास योजना-ग्रामीण राबविण्यात येत आहे. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार प्रति लाभार्थी अनुदान देय आहे.
(४) प्रधानमंत्री आवास योजना-शहरी प्रमाणेच प्रधानमंत्री आवास योजना -ग्रामीणसाठी देखील रु.२.५० लक्ष इतके अनुदान देण्यात यावे, याकरीता केंद्र शासनास प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्भावत नाही.

---

**बीड नगरपरिषदेतील हद्दवाढ भागातील विकास कामासाठी मंजूर निधीमधे झालेला गैरव्यवहार**

**(२९) १२३७८ (१०-०७-२०२०). श्री.संदिप क्षिरसागर (बीड) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बीड नगरपरिषदेच्या हद्दवाढ भागातील विकास कामांसाठी शासनाने सुमारे २८ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला असून नगरपरिषदेतील नगराध्यक्ष, मुख्याधिकारी व इतरांनी संगनमत करून हा निधी कामे न करता हडप केल्याची तक्रार नगरसेवक श्री.अमर नाईकवाडे यांनी दिनांक २७/४/२०१९ रोजी वा त्या सुमारास शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बीड नगरपरिषदेतील नगर सेवक श्री.अमर नाईकवाडे व इतरांनी उक्त प्रकरणी कामाचे अंदाजपत्रक, तांत्रिक मान्यता, मोजमाप पुस्तिका व इतर कागदपत्रांची मागणी रीतसर करूनही त्यांना अद्यापही कागदपत्रे उपलब्ध करण्यात आली नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, बीड शहराच्या हद्दवाढ भागात सुमारे २८ कोटी रुपयांच्या निधीतील प्रस्तावित कामे प्रत्यक्षात न करता त्याची उचल केल्याप्रकरणी दोषी अधिकारी व नगरपरिषदेतील नगराध्यक्ष यांचेविरुद्ध शासन कोणती कारवाई करणार वा करित आहे,
(४) असल्यास, तक्रारदार नगरसेवक व इतर यांनी वारंवार जिल्हाधिकारी, बीड, विभागीय आयुक्त, औरंगाबाद, नगरपरिषद प्रशासन आयुक्त व संचालक, मुंबई यांच्याकडे तक्रार देऊनही मुदतीत या तक्रारीबाबत गांभीर्याने कार्यवाही न केल्याप्रकरणी संबंधितांविरुद्ध शासन कोणती कारवाई करणार वा करित आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२७-०७-२०२०) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.

सदर प्रकरणी वेळोवेळी तक्रारदाराने मागणी केल्यानंतर कामाचे अंदाजपत्रक, तांत्रिक मान्यता, मोजमाप पुस्तिका व इतर कागदपत्रे तक्रारदारास उपलब्ध करुन देण्यात आले असल्याचे मुख्याधिकारी, बीड नगरपरिषद यांनी कळविल्याबाबत जिल्हाधिकारी, बीड यांनी अहवाल सादर केला आहे.

(३) व (४) श्री. नाईकवाडे यांच्या तक्रारीतील मुद्यांबाबत विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांच्या स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

## मुंबई विमानतळ परिसरातील फनेल झोन विकास नियंत्रण नियमावलीतील तरतुदीचा प्रस्ताव प्रलंबित असल्याबाबत

**(३०) १२४२७ (१८-०९-२०२०). अॅड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), अॅड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.संजय पोतनीस (कलिना) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील विमानतळ परिसरातील इमारती ह्या ५० वर्षाहून अधिक काळापासून अस्तित्वात असून अनेक इमारती या जीर्ण अवस्थेत असून काही मोडकळीस आल्या असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथील इमारती दोन ते तीन मजल्याच्या असून उंचीची मर्यादा असल्याने या इमारतींना लागू करण्यात आलेल्या चटई क्षेत्रफळात या इमारतींचा पुनर्विकास शक्य नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर एअरपोर्ट रनवे फनेलमध्ये येणा-या इमारतींना पुनर्विकास करताना अतिरिक्त एफएसआय व टीडीआरचा लाभ मिळण्यासाठी प्रारूप विकास नियंत्रण नियमावली सन २०३४ मध्ये विशेष तरतूद करण्यात येणार असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत महानगरपालिकेने नगरविकास विभागास पाठविलेल्या प्रस्तावाबाबत अंतिम निर्णय घेण्यात आला आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२५-०२-२०२१) :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेने पावसाळयापूर्वी केलेल्या सर्वेक्षणानुसार विमानतळालगतच्या परिसरामध्ये अतिधोकादायक व मोडकळीस आलेल्या एकूण १६७ इमारती असल्याचे आढळून आले आहे.

(२), (३), (४) व (५) बृहन्मुंबई महानगरपालिकेची विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली - २०३४ शासनाने दि.८/०५/२०१८ रोजी मंजूर केली आहे. त्यामध्ये विनियम ४५(ब) समाविष्ट असून त्यानुसार विमानतळ परिसरातील उंचीच्या निर्बंधामुळे मुळ चटई निर्देशांक अनुपयोजीत असल्यास त्याबाबतचा टि.डी.आर. देण्याची तरतूद करण्यात आली आहे. तथापी ही बाब शासनाने मंजूरीमधून प्रलंबित ठेवली आहे. विमानतळ फनेल झोनमधील इमारतींचे पुनर्विकासाकरीता येणाऱ्या अडचणीचे निवारण करणे बाबत स्थानिक लोकप्रतिनीधी तसेच नागरीक यांचे विविध पत्रे प्राप्त झाली आहेत. त्यानुसार फनेल झोन क्षेत्राचे पुनर्विकासाचे अनुषंगाने महानगरपालिकेने एक समिती स्थापन केली. या समितीने आपला अहवाल शासनास

सादर केला असून त्यावर संचालक, नगररचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे अभिप्राय घेण्यात आले असून प्रस्तावावर पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

---

**जोगेश्वरी (मुंबई) मौजे मजास न.भू.क्र.५० व ५१ या भूभागावर नवीन विभागीय महानगरपालिका कार्यालयाची उपलब्धता करणेबाबत**

**(३१) १२४७३ (२०-०९-२०२०). श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जोगेश्वरी (पूर्व) (मुंबई) विधानसभा ही प्रमुख्याने महानगरपालिकेच्या के पूर्व व पी दक्षिण गोरेगाव या दोन कार्यालयाशी जोडली गेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर दोन्ही विभागीय कार्यालयामध्ये नागरी कामांसाठी जाण्यासाठी रहिवाश्यांना प्रवासाच्या दृष्टीने गैरसोयीचे ठरत असल्याने याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी महानगरपालिकेची प्रशासकीय कामे सुरळीत करण्यासाठी आजगावकर प्लॉट, पश्चिम द्रुतगती मार्ग, जोगेश्वरी (पूर्व) येथे अनुक्रमे दिनांक ९ एप्रिल, २०१३, तसेच दिनांक २४ फेब्रुवारी, २०१४ व दिनांक १५ मे, २०१४ रोजी आयुक्त, महानगरपालिका यांच्याबरोबर घेतलेल्या बैठकीत दिलेल्या अभिप्रायाबद्दल अजूनही कार्यवाही न होण्यामागची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी अभ्यास समिती स्थापन करून त्यांचा अहवाल आल्यानंतर कार्यवाही करण्याबाबत मा.मंत्री महोदयांनी केलेल्या सूचना कार्यन्वित झाल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, आतापर्यंत विविध लोकशाही आयुधांच्या माध्यमातून केलेला पत्रव्यवहार, बैठका, पाहणी करूनही अद्यापही सुविधा देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (११-०२-२०२१) :**(१) हे खरे आहे.

(२), (३) व (४) बृहन्मुंबई महानगरपालिकेतील प्रभागांच्या नवीन रचनेनुसार विभाग कार्यालयांचे विभाजन व पुनर्रचना करण्यासंदर्भात अहवाल सादर करण्याकरिता गठीत करण्यात आलेल्या दोन उपायुक्तांच्या समितीने दिलेला अहवाल गटनेत्यांच्या सभेपुढे सादर करण्यात आला होता.

तथापि सदर प्रकरणी विविध गटनेत्यांनी उपस्थित केलेले हरकती/सूचना/मुद्दे हे पूर्णतः तांत्रिक व धोरणात्मक असल्याने नव्याने दोन सह आयुक्तांची समिती गठीत करण्यात आली असून, सदर समितीकडून अहवाल मागविण्यात आला आहे.

तसेच, जोगेश्वरी मौजे मजास न.भू.क्र. ५० व ५१ या भूभागावर नवीन विभाग कार्यालयाची निर्मिती ही बाब तांत्रिक व धोरणात्मक स्वरुपाची असल्याने याबाबतचा अहवाल दोन सह आयुक्तांच्या समितीकडून मागविण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्‍भ्‍ावत नाही

---

**राज्यातील ट्रामा केअर युनिटची व्यवहार्यता तपासून धोरण निश्चित करण्याबाबत**

**(३२) १२५४१ (१०-०९-२०२०). श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ट्रामा केअर युनिटची केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांच्या आधारे व्यवहार्यता तपासून धोरण निश्चित करण्यासाठी शासनाने एक समिती गठीत केली आहे, हे खरे आहे काय;

(२) असल्यास, सदरहू समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय;

(३) असल्यास, सदरहू समितीने अहवालात नमूद केलेल्या शिफारशींचे थोडक्यात स्वरूप काय आहे;

(४) असल्यास, सदरहू समितीच्या शिफारशीन्वये राज्यातील ट्रामा केअर युनिटबाबत शासनाने कोणते धोरण निश्चित केले वा करण्यात येत आहे;

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राजेश टोपे (१७-०२-२०२१) :** (१) होय,हे खरे आहे.

(२) होय, सदर समितीने दि.१३ नोव्हेंबर,२०१९ ला आपला अहवाल शासनास सादर केला आहे.

(३) व (४) दि.१८ सप्टेंबर २०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये ट्रामा केअर युनिटची (TCU) केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांच्या आधारे व्यवहार्यता तपासून धोरण निश्चित करण्यासंदर्भात गठीत केलेल्या तांत्रिक समितीच्या शिफारशी धरुन राज्यातील ट्रॉमा केअर युनिटबाबतचे धोरण निश्चित करण्यात आले आहे.

अ) नविन TCU हे Level ३ TCU असणे आवश्यक असून Level ३ TCU सुरू करण्यास मान्यता देतांना ते जिल्हा रुग्णालय/सामान्य रुग्णालय/उपजिल्हा रुग्णालय (१०० बेड) या ठिकाणी मंजूर करण्यात यावेत तसेच त्यासाठी १०० ते २०० किलो मीटर अंतराची अट असावी.

ब) कार्यान्वित असलेल्या परंतु केवळ १०० ते २०० कि.मी अंतराची अट पूर्ण करणा-या सर्व सध्याच्या ग्रामीण रुग्णालय/उप जिल्हा रुग्णालय (५० ते १०० खाटा) आणि जिल्हा रुग्णालयातील TCU चे Level ३ TCU मध्ये श्रेणीवर्धन करण्यात यावे.

क) समितीच्या शिफारशीनुसार Level ३ TCU च्या मनुष्यबळ, उपचार, साधनसामग्री व सुविधांमध्ये दर्जा वाढ करण्यात यावी.

ड) निकषात न बसणा-या सर्व TCU च्या मान्यता रद्द करण्यात याव्या तसेच ग्रामीण रुग्णालयाशी संलग्न असलेले १७ TCU बंद करण्यात येऊन त्यांचे रुपांतर ५० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयात करण्यात यावे.

(५) प्रश्न उदभवत नाही.

---

## सर्वांसाठी घरे -२०२२ या धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी लाभार्थ्यांस मालकी प्रमाणपत्र देण्याबाबत

**(३३) १२६९० (०९-०९-२०२०). श्री.अभिमन्यु पवार (औसा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सर्वांसाठी घरे -२०२२ या धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी ग्रामीण भागातील दिनांक १ जानेवारी, २०११ पूर्वीची शासकीय जमिनीवरील निवासी प्रयोजनासाठी केलेली अतिक्रमणे नियामाकुल करण्याबाबत शासनाने ग्रामविकास विभागाच्या दिनांक १६ फेब्रुवारी, २०१८ रोजीच्या शासन आदेशानुसार मान्यता दिली आहे, हे खरे आहे काय ,

(२) असल्यास, सदर निवासी अतिक्रमणे नियमाकुल करण्याबाबत लाभार्थ्यांचे प्रस्ताव औसा पंचायत समिती स्तरावरून लातूर जिल्हा परिषदेस सादर झालेले असतानाही अतिक्रमण

नियमाकुल करून संबधित भोगवटाधारक लाभार्थ्यास मालकी प्रमाणपत्र अद्यापही मिळाले नसल्याचे माहे फेब्रुवारी २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबतचे किती प्रस्ताव जिल्हा परिषद स्तरावर मान्यतेसाठी प्राप्त झाले असून किती प्रस्ताव मान्यते अभावी प्रलंबित आहेत व त्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, शासन आदेशानुसार निवासी प्रयोजनासाठी केलेली अतिक्रमणे तात्काळ नियमाकुल करण्यासह लाभार्थ्यांना मालकी प्रमाणपत्र देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (०१-०२-२०२१) :**(१) व (२) होय, हे खरे आहे

(३) व ४) अतिक्रमण नियमानुकूल करण्यासाठी जिल्हा परिषद, लातूर स्तरावर ६५ प्रस्ताव प्राप्त झाले असून त्यापैकी ८ प्रस्तावांना मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.लातूर यांनी मंजूरी दिली आहे . १७ प्रस्तावामध्ये त्रुटी आढळल्याने जसे की, अतिक्रमण केल्याचे वर्ष नमूद नसणे, नमूना नंबर ८ वर लाभार्थ्यांची नावाची नोंद नसणे, अतिक्रमणधारकाचे घराचे फोटो नसणे इत्यादी कारणांमुळे ग्रामपंचायतीकडे परत पाठविण्यात आले आहे. उर्वरित ४० अतिक्रमणे नियमानुकुल प्रस्तावांची पडताळणी सुरु असून अतिक्रमणे नियमानुकूल करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच इतर विविध विभागांच्या जमिनीवरील अतिक्रमणे नियमानुकूल करण्यासाठी संबंधित विभागांशी समन्वय साधून, अतिक्रमणे नियमानूकूल करण्याची प्रक्रिया जलदगतीने व सोईचे व्हावे याकरीता जिल्हा स्तरावर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली शासन निर्णय दि.९.९.२०१९ अन्वये समिती गठीत करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भावत नाही

---

**हिंगणी (ता.सेलू ,जि.वर्धा) येथे प्राथमिक आरोग्य केद्र कार्यान्वित करण्याबाबत**

**(३४) १२७३८ (१०-०७-२०२०). डॉ.पंकज भोयर (वर्धा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगणी (ता.सेलू,जि.वर्धा) येथे महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्रमांक स्थापना-२०१९/प्र . क्र. २५४/आरोग्य-३, दिनांक २५ सप्टेंबर, २०१९ अन्वये प्राथमिक आरोग्य केंद्र मंजूर करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्राथमिक आरोग्य केद्र कार्यान्वित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राजेश टोपे (१७-०२-२०२१) :** (१) होय,हे खरे आहे.

(२) हिंगणी ता.सेलू जि.वर्धा येथे प्रा.आ केंद्राचे बांधकाम करण्यास ग्रा.पं हिंगणी यांनी प्रस्तावीत केलेली जागा मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प यांचे नावाने नोंद करण्याबाबत मा.जिल्हाधिकारी वर्धा यांचेकडून दि. ९ जून, २०२० ला आदेश प्राप्त झालेला आहे.सन २०२०-२१ या आर्थिक वर्षात प्राथमिक आरोग्य केंद्राचे बांधकाम करण्यास डी.पी.डी.सी मध्ये निधी उपलब्ध नाही.निधी उपलब्ध झाल्यावर सदर प्राथमिक आरोग्य केंद्राचे बांधकाम हाती घेण्यात येईल.

(३) कार्यवाही सुरू आहे.

---

**मंद्रूप, वसवनगर, निंवर्गी, विंचूर, शंकरनगर, अंत्रोळी, वडापूर (जि.सोलापूर) या भागात उजनी धरणातून पाणी पुरवठा करणेबाबत**

**(३५) १२८३० (१०-०८-२०२०). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंद्रूप, वसवनगर, निंवर्गी, विंचूर, शंकरनगर, अंत्रोळी, वडापूर (जि.सोलापूर) या भागात दुष्काळीस्थिती असल्याने तेथील स्थानिक नागरिकांनी उजनी धरणातून पाणी सोडण्याची मागणी माहे एप्रिल, २०२० मध्ये वा त्यादरम्यान करुनही अदयापपर्यंत पाणी सोडले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या भागात उजनी धरणातून पाणी न सोडल्याने पिकांचे नुकसान झाले असून तेथील नागरिकांचीही पिण्याच्या पाण्यासाठी गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार मंद्रूप, वसवनगर, निंवर्गी, विंचूर, शंकरनगर, अंत्रोळी, वडापूर या भागात उजनी धरणातून पाणी पुरवठा करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील (०२-०२-२०२१) :** (१) हे खरे नाही.

उजनी धरणातून उन्हाळ हंगाम आवर्तन क्र.२ साठी दि. ०१/०५/२०२० रोजी उजनी डावा कालव्यात पाणी सोडण्यात आले होते.

बेगमपूर शाखा कालवा हा उजनी डावा कालवा कि.मी. १२६ मधून सुरू होत असून लांबी ५५ कि.मी. आहे. बेगमपूर शाखा कालव्यातून उन्हाळ हंगाम आवर्तन क्र.२ साठी दि. ११/०५/२०२० पासून दि. २४/०५/२०२० पर्यंत सिंचनासाठी पाणी सोडण्यात आले. या शाखा कालव्यावरील पुच्छ भागातील (कि.मी.३५ च्या पुढे) निंबर्गी, विंचूर, शंकरनगर, अंत्रोळी, वडापूर या गावांना तेथील लाभधारक शेतक-यांनी पाणी मागणी अर्ज दिले नुसार कि.मी. ४५ मधील वितरीका क्र. ४८ पर्यंत पाणी सोडण्यात आले आहे.

कुरूल शाखा कालवा हा उजनी डावा कालवा कि.मी. १२८ मधून सुरु होत असून लांबी ६५ कि.मी. आहे. कुरुल शाखा कालव्यातून उन्हाळ हंगाम आवर्तन क्र.२ साठी दि. १२/०५/२०२० पासून दि. २६/०५/२०२० पर्यंत सिंचनासाठी पाणी सोडण्यात आले. या शाखा कालव्यावरील पुच्छ भागातील (कि.मी.५३ च्या पुढे) मंद्रूप या गावाला तेथील लाभधारक शेतक-यांनी पाणी मागणी अर्ज दिलेनुसार कि.मी. ५८ मधील वितरीका क्र. २४ पर्यंत पाणी सोडण्यात आले आहे. या भागातील पाणी अर्ज प्राप्त शेतक-यांना सिंचनासाठी आवर्तनाचे पाणी देण्यात आले आहे.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबईतील पुनर्रचित इमारतींचा पुर्नविकास प्रलंबित असल्याबाबत**

**(३६) १२८५६ (१९-०९-२०२०). श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.सुनिल कांबळे (पुणे**

**कॅन्टोन्मेंट), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.सुनील राणे (बोरीवली) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील सुमारे ४५ वर्षापूर्वीच्या ३३६ जुन्या इमारती, चाळी पाडून बांधण्यात आलेल्या पुनर्रचित इमारतींचा पुर्नविकास पूर्णपणे थांबला असल्याचे माहे एप्रिल, २०२० मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू इमारतींचा पुनर्विकास करण्याबाबत शासनाची भूमिका काय आहे तसेच सदर इमारतींचा पुर्नविकास करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. जितेंद्र आव्हाड (२४-०२-२०२१) :** (१) व (२) होय, हे अंशतः खरे आहे

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाने मुंबई शहरातील जुन्या व उपकरप्राप्त इमारती तोडून, त्या जागी सन १९७३ ते २०१७ या कालावधीत एकूण ४५४ पुनर्रचित इमारती बांधल्या आहेत. यापैकी बहुतांश इमारतींना ३० वर्षापेक्षा जास्त कालावधी झाला असल्याने कमकुवत अवस्थेत असून, अशा इमारतींचा पुनर्विकास व्हावा, यासाठी विकास नियंत्रण नियमावली ३३ (७) मध्ये सुधारणा करण्याबाबत नगर विकास विभागाच्या दि.१८.११.२०२० रोजीच्या शासन निर्णयाद्वारे विकास नियंत्रण नियमावली ३३ (७) व ३३ (९) मध्ये प्रस्तावित सुधारणा करण्यासाठी हरकती / सुचना मागविल्या आहेत. प्रस्तावित सुधारणामध्ये म्हाडाने पुनर्रचित केलेल्या तसेच पी.एम.जी.पी. अंतर्गत बांधलेल्या इमारतींचा पुनर्विकास करण्याची तरतूद केली आहे. प्रस्तावित सुधारणा अंतिम झाल्यानंतर म्हाडाने पुनर्रचित केलेल्या इमारतींचा पुनर्विकास करता येणार आहे.

(३) प्रश्न उद्भ‌ावत नाही.

---

**संग्रामपूर (जि. बुलडाणा) तालुक्यातील बंद असलेली आरोग्य उपकेंद्र व आयुर्वेदिक दवाखाने सुरू करण्याबाबत**

**(३७) १२९९७ (१७-०७-२०२०). डॉ.संजय कुटे (जळगाव जामोद) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संग्रामपूर (जि. बुलडाणा) तालुक्यात आरोग्य विभागाचे १५ उपकेंद्र व ३ आयुर्वेदिक दवाखाने असून यातील १० उपकेंद्र व ३ आयुर्वेदिक दवाखाने टाळेबंदीच्या काळात सुद्धा कायमचे बंद असल्याचे माहे जून, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे आदिवासी बहुल तालुक्यातील गावांतील नागरिकांना आरोग्य सेवा मिळत नसल्याने त्यांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त उपकेंद्र व आयुर्वेदिक दवाखाने बंद असण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, सदर आरोग्य उपकेंद्र व आयुर्वेदिक दवाखाने तात्काळ सुरू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राजेश टोपे (१७-०२-२०२१) :** (१) हे अंशतः खरे आहे.

ज्या आयुर्वेदिक दवाखान्यातील तसेच उपकेंद्रातील पदे रिक्त आहेत तेथे नजीकच्या कर्मचा-यांना अतिरिक्त कार्यभार देवून कामकाज चालविले जाते त्यामुळे सर्व उपकेंद्र व आयुर्वेदिक दवाखाने सुरू आहेत
(२) नाही, हे खरे नाही.
(३) आणि (४) आयुर्वेदिक दवाखान्यातील तसेच उपकेंद्रातील पदे रिक्त आहेत.सदर पदे भरण्याबाबतची कार्यवाही ग्रामविकास विभागाच्या स्तरावर सुरू आहे.
(५) प्रश्न उदभवत नाही.

---

**गुहागर (जि. रत्नागिरी) पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक यांच्या विरुद्ध कारवाई करण्याबाबत**

**(३८) १३३०६ (१३-०९-२०२०). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गुहागर (जि. रत्नागिरी) पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अरविंद बोडके यांच्या सेवाकालावधीत गुहागर तालुक्यात मोठया प्रमाणात अवैध धंदे सुरू असून दि. २२ नोव्हेंबर, २०१९ रोजी स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा, रत्नागिरी यांनी शृंगारतळी येथे मटका-जुगारसारख्या अवैध धंदयांवर कारवाई केल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या कारवाईत अधिक तपासासाठी ताब्यात घेतलेल्या आरोपिंना क्षुल्लक कारणे दाखवून पोलीस निरीक्षक अरविंद बोडके यांनी जामिनावर सोडून दिले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कोरोना संसर्गाच्या कालावधीत अत्यावश्यक सेवेतील वाहनधारकांना व सर्वसामान्य नागरिकांना विशेष करून गर्भवती महिलांना नाहक कायदयाची भीती दाखवून त्रास देणे, त्यांच्याशी अश्लील भाषेत बोलणे, स्थानिक स्वराज्य संस्थांशी निगडीत लोकप्रतिनिधींशी अपमानास्पद वर्तन करणे, परवानाधारक व्यक्ती व वाहनचालकांना मारहाण करणे, परवानापत्र फेकून देणे, उर्मटपणे वागणे अशा श्री. बोडके यांच्या कारभाराविरोधात सर्वसामान्य नागरीक आणि स्थानिक स्वराज्य संस्थेच्या अनेक लोकप्रतिनिधींनी सामूहिकरित्या तक्रार केल्यानंतर त्यावर स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ९ एप्रिल, २०२० रोजीच्या पत्रान्वये पोलीस अधिक्षक, रत्नागिरी तसेच विषेश पोलीस महानिरीक्षक, कोकण परीक्षेत्र यांच्याकडे लेखी तक्रार करून पोलीस निरीक्षक अरविंद बोडके यांच्यावर कारवाईची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी चौकशी केली आहे काय व त्यानुसार संबंधित पोलीस निरीक्षक यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख (०५-०३-२०२१) :** (१) गुहागर (जि.रत्नागिरी) पोलीस ठाण्याचे पोलीस निरिक्षक, अरविंद बोडके यांच्या सेवा कालावधीत अवैध धंदयांशी संबंधीत एकुण १७ प्रकरणी संदर्भात कारवाई करण्यात आली असून दिनांक २२ नोव्हेंबर २०१९ रोजी स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा रत्नागिरी यांनी शृंगारतळी, ता.गुहागर येथे मटका, जुगार अवैध धंदयावर कारवाई केली आहे.
(२) गुहागर पो.ठाणे गु.र.नं.८१/२०१९ महाराष्ट्र जुगार प्रतिबंध कायदा कलम ४.५ या गुन्हयाचा

तपास सपोफौ/ए.एम.पवार यांचेकडे दिलेला होता. त्यांनी आरोपीत यांना सी.आर.पी.सी.कलम ४९(अ) (१) प्रमाणे नोटिस देऊन गुन्हयाचा तपास करुन आरोपीत यांना दि.२३/११/२०१९ रोजी २.४५ वा. अटक केलेले असून सदरचा गुन्हा जामिनपात्र असल्याने व आरोपीत यांनी योग्य व लायक जामिन दिल्याने त्यांना तपासिक अंमलदार सपोफौ/ए.एम.पवार, यांनी दि.२३/११/२०१९ रोजी जमिनावर मुक्त केलेले आहे.

(३) हे खरे आहे.

(४) सदर प्रकरणी उपविभागीय पोलीस अधिकारी, चिपळूण यांनी शुंगारतळी व गुहागर बाजारपेठेतील अत्यावश्यक सेवा पुरविणारे किराणामाल, औषधे व भाजीपाला दुकानदार तसेच त्यांचेकडील कर्मचारी आणि परिसरातील राजकिय/सामाजिक कार्यकर्ते यांचेकडे चौकशी करुन त्यांचे जबाब नोंदविण्यात आले आहेत. एकंदरीत अर्ज चौकशीमध्ये पोलिस निरिक्षक, श्री.अरविंद बोडके यांनी लॉकडाऊन काळात सामान्य जनतेला उर्मट/अपमानास्पद वागणूक दिले बाबत चौकशीमध्ये निष्पन्न झाले नाही.

(५) प्रश्न उद्‌भ्‍ावत नाही.

---

## राज्यात वैद्यकीय महाविद्यालयांत सुरु असलेल्या रक्तद्रव्य उपचार केंद्राबाबत

**(३९) १३३५९ (१४-०९-२०२०). श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील २३ वैद्यकीय महाविद्यालयांत रक्तद्रव्य उपचार केंद्र सुरु करण्यात आले असल्याचे दिनांक ३० जून, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रक्तद्रव्य उपचाराची उपचार पद्धती काय आहे,

(३) असल्यास, या रक्तद्रव्य उपचार केंद्राच्या माध्यमातून आतापर्यंत किती रुग्णांवर रक्तद्रव्य उपचार करण्यात आले आहेत,

(४) असल्यास, या रक्तद्रव्य उपचारामुळे आतापर्यंत किती रुग्ण रोगमुक्त झाले आहेत?

**श्री. अमित विलासराव देशमुख (१८-०१-२०२१) :** (१) राज्यातील २१ शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये रक्तद्रव्य उपचार केंद्र सुरु करण्यात आलेली आहेत.

(२) ज्या रुग्णांना कोविड-१९ ची लागण झालेली होती व ते सदर संसर्गातून बरे झालेले आहेत. अशा रुग्णांनी त्यांच्या शरीरात ॲण्टी बॉडीज तयार झाल्यानंतर म्हणजेच २८ दिवसांच्या कालावधीनंतर प्लाझ्मा दान केल्यास त्यांच्या प्लाझ्माचा इतर कोविड-१९ च्या रुग्णांना वापरल्यास त्यांना झालेला रोग संसर्ग कमी करण्यास मदत होऊ शकते.

(३) कोविड-१९ रुग्णांवर उपचार करताना एकूण ४९८ बॅग्स प्लाझ्माचा वापर करण्यात आलेला आहे. यामध्ये ४४९ प्लाझ्मा बॅग ऑफ लेबल ४९ प्लॅटिना ट्रायल चा समावेश आहे तसेच सद्यस्थितीत संपूर्ण महाराष्ट्र राज्यात एकूण ७६८ बॅग शिल्लक आहेत.

(४) सदर उपचार पद्धती ही ट्रायल स्वरुपाची असल्यामुळे किती रुग्ण रोगमुक्त झाले हे सांगणे वैद्यकीयदृष्ट्या संयुक्तीक होणार नाही.

---

**सांगली जिल्ह्यातील मेंगाणवाडी, धोंडगेवाडी (ता. खानापूर) कचरेवाडी (ता. तासगांव) व यपावाडी (ता. आटपाडी) या गावांची नावे बदलण्याबाबत**

**(४०) १३६२८ (१३-०९-२०२०). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्ह्यातील मेंगाणवाडी, धोंडगेवाडी (ता. खानापूर) कचरेवाडी (ता. तासगांव) व यपावाडी (ता. आटपाडी) या गावांची नावे बदलण्याचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सांगली जिल्ह्यातील सदरहू गावांची नावे बदलण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,या प्रस्तावांवर किती कालावधीत कार्यवाही होणे अपेक्षित आहे,

(३) नसल्यास, सदर प्रस्तावास मंजुरी देण्यास विलंब लागण्याची कारणे काय आहेत ?

**श्री. उद्धव ठाकरे (०२-०३-२०२१) :** (१), (२) व (३)

गावाचे / शहराचे नांव बदलण्यासंर्भात केंद्र सरकारच्या गृह मंत्रालयाने त्यांचे पत्र क्रमांक १३०/५३ दिनांक ११ सप्टेंबर १९५३ अन्वये मार्गदर्शक तत्वे विहीत केली आहेत. त्यानुसार आवश्यक तो प्रस्ताव जिल्हाधिकारी यांचे मार्फत विभागीय आयुक्तांकडून शासनास सादर करण्यात येतो. तद्नंतर सदर प्रस्ताव तपासून केंद्र शासनास मान्यतेस्तव सादर करण्यात येतो.

सांगली जिल्ह्यातील मेंगाणवाडी या गावाचे नाव बदलण्याबाबतचा प्रस्ताव विभागीय आयुक्त, पुणे यांच्या दि.०६.१२.२०१८ च्या पत्रान्वये शासनास प्राप्त झाला असून प्रस्तावामध्ये त्रुटी असल्याने त्यांना प्रस्ताव तपासून फेरसादर करण्याबाबत दि.२०.०२.२०१९ च्या पत्रान्वये कळविले आहे. परंतु अद्याप याबाबत सुधारीत प्रस्ताव शासनास सादर करण्यात आलेला नाही. तसेच धोंडगेवाडी (ता. खानापूर) कचरेवाडी (ता. तासगांव) व यपावडी (ता. आटपाडी) या गावांची नावे बदलण्याचा प्रस्ताव विभागीय आयुक्त, पुणे मार्फत शासनास सादर करणेबाबत जिल्हाधिकारी, सांगली यांना दि.२९ जुलै, २०१९ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. सदर प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर तो तपासून केंद्र शासनास मान्यतेस्तव पाठविण्यात येईल.

---

**मे.सेव्हन इलेव्हन प्रा.लि. यांनी मौजे नवघर येथील कांदळवन क्षेत्रात भराव टाकून क्लबचे बांधकाम केल्याबाबत**

**(४१) १३६७३ (२०-०९-२०२०). श्री.संजय गायकवाड (बुलढाणा) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मे.सेव्हन इलेव्हन प्रा.लि. यांनी मौजे नवघर येथील कांदळवन क्षेत्रात भराव टाकून क्लबचे बांधकाम केल्याप्रकरणी त्यांचेविरूध्द मिरारोड पोलीस स्टेशन येथे महसुल विभागाच्या

अधिकाऱ्यांनी एफ.आय.आर. दाखल केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू बांधकाम कंपनीस मिरा भाईंदर महानगरपालिकेने सन २०१५ मध्ये मौजे नवघर येथील स.क्र. २६५/४, २६६/२,३,५,६, २६७/३ (जुना) ८१/४, ६७/२, ३/५,६, ६७/३ (नविन) या मंजूर रेखांकनात मौजे नवघर सर्व्हे क्रमांक २६५/२, २६६/१,४ व २६७/२ (जुना) ८१/२, ६७/१,४ व ५२/२ (नविन) या जागा समाविष्ट करन एकत्रित जागेत बांधकाम करण्याची परवानगी दिलेली असताना पुन:श्च माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये सुधारित बांधकाम परवानगी देण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदरहू क्लबच्या बांधकामाबाबत शासनाकडे प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने नियमानुसार कार्यवाही करण्याबाबत आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांना शासनाने कळविले असून या प्रकरणाची सद्य:स्थितीची माहिती सादर करण्याबाबत माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्या दरम्यान कळविले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, त्यानुषंगाने आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांचेकडून शासनास माहिती सादर करण्यात आली आहे काय, त्यात काय नमूद करण्यात आले असून त्याचा तपशील काय आहे,

(५) असल्यास, सदरहू माहिती शासनास केव्हापर्यंत उपलब्ध होणार आहे, तसेच या विलंबा प्रकरणी मिरा भाईंदर महानगरपालिकेचे जबाबदार अधिकारी व कर्मचारी यांचेवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, त्याचा तपशील काय आहे, तसेच सदरहू जबाबदार अधिकारी, कर्मचारी यांचेवर कोणती कारवाई तसेच किती कालावधीत करण्यात येणार आहे,

(६) असल्यास, प्रस्तुत प्रकरणी संबंधित कंपनीकडून कांदळवन क्षेत्रात भराव केल्याप्रकरणी त्यांचे विरूध्द दाखल असलेला एफ.आय.आर. व त्याप्रकरणी न्यायालयात दाखल केलेला खटला पाहता सदरहू बांधकाम कंपनीचे बांधकाम तातडीने निष्कासित करण्याबाबत शासन कोणती कार्यवाही करणार आहे व किती कालावधीत,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०८-०२-२०२१) :** (१) अशंत: खरे आहे.

मौजे नवघर स.क्र.८१(२६५)/२,४ ६७(२६६)/१ या जागेवर माती भराव केल्याप्रकरणी मंडळ अधिकारी यांनी गुन्हे दाखल केले आहेत. तथापि गुन्हे दाखल झालेल्या जागेत क्लब हाऊस चे बांधकाम नाही.

(२) मंजूर विकास योजनेप्रमाणे उक्त जागा ना-विकास क्षेत्रात समाविष्ट असून भागश: ३०.० मी.रुंद विकास योजना रस्त्याने बाधीत होत आहे. तसेच प्राप्त सी.आर.झेड च्या वर्गीकरणाच्या नकाशाप्रमाणे भागश: सी.आर.झेड ने बाधीत होत आहेत. सदर जागेपैकी मौजे नवघर, सं.क्र.२६५/२,४, २६६/१ ते ६, २६७/२,३ या जागे मधील सी.आर.झेड ने बाधीत क्षेत्र वगळून उर्वरित सी.आर.झेड ने बाधीत नसलेल्या क्षेत्रामध्ये विकासकाच्या विनंती अर्जानुसार जिमनॅशियम व क्लब हाऊसच्या इमारतीसाठी दि.१८/०२/२०१७ अन्वये सुधारीत बांधकाम परवानगी देण्यात आलेली आहे.

(३) हे खरे आहे.

(४) शासनाच्या दिनांक ०६/०१/२०२० च्या पत्रास अनुसरुन मिरा-भाईंदर महानगरपालिकेने दि.२८/०१/२०२१ रोजीच्या पत्रान्वये शासनास अहवाल सादर केला आहे. सदर अहवालामध्ये प्रस्तुत जागेवरील बांधकामाची सद्यस्थिती नमूद केली आहे. तसेच मौजे नवघर सं.क्र.८१

(२६५)/२ ते ४, ६७(२६६)/१ ते ६, ५२(२६७)/१ ते ३, ५१(२५९)/४, ६८(२६०)/३ या ना-विकास विभागातील जागेचा कलम ३७ नुसार फेरबदल प्रस्ताव दिनांक २८/०५/२०१९ रोजी शासनाच्या मंजूरीसाठी सादर केल्याचे नमूद केले आहे.

(५) मिरा-भाईंदर महानगरपालिकेकडून दि.२८/०१/२०२१ रोजीच्या पत्रान्वये शासनास अहवाल प्राप्त झाला असून त्यानुसार तपासणी/कार्यवाही शासनस्तरावरुन करण्यात येत आहे.

(६) कांदळवन क्षेत्रात भराव केल्याप्रकरणी संबंधितांविरुध्द एफआरआर दाखल करण्यात आला असून त्यानुषंगाने संबंधित कार्यालयामार्फत कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच प्रकरणी मा.उच्च न्यायालयात याचिका दाखल आहे.

(७) प्रश्न उदभवत नाही.

---

**डोंगरी मुंबई येथील बाल सुधार गृहातून अल्पवयीन मुलांनी पलायन केल्याबाबत**

**(४२) १३७७८ (१३-०९-२०२०). डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डोंगरी मुंबई येथील बाल सुधारगृहातून तीन अल्पवयीन मुलांनी भिंत ओलांडून पलायन केल्याचे माहे जुलै, २०२० च्या पहिला आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रशासनाच्या दूर्लक्षपणामुळे मुले पळ काढू शकले असून यासंदर्भात पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) (०३-०३-२०२१) :** (१) (२) व (३) दि चिल्ड्रेन्स एड् सोसायटी, मुंबई संचलित निरीक्षणगृह/बालगृह, उमरखाडी, डोंगरी मुंबई या बालसुधारगृहातून दि.३०.०६.२०२० रोजी प्रवेशितांना बाग कामाचे प्रशिक्षणाकरीता निवासागृहाबाहेर आणले असता, तीन प्रवेशितांनी नजर चुकवून संस्थेच्या सुरक्षा भिंतीवरुन पलायन केले आहे. यासंदर्भात दि.०१.०७.२०२० रोजी मा.वरिष्ठ पोलीस निरीक्षक, डोंगरी पोलीस ठाणे, डोंगरी, मुंबई येथे तक्रार दाखल करण्यात आली आहे. तीन प्रवेशितांपैकी दि.०१.०७.२०२० रोजी रात्री दोन प्रवेशित संस्थेत परत आले असुन तिसऱ्या प्रवेशितांचा शोध घेण्याचे काम डोंगरी पोलीस ठाणेद्वारे चालु आहे.

उपरोक्त घटनेच्या अनुषंगाने अंतर्गत चौकशी केली असता गेट-वे ऑफ इंडिया बघण्याची उत्सुकता असल्याने प्रवेशितांनी संस्थेतून पलायन केले असल्याची बाब निदर्शनास आली. याकरीता संस्थेमध्ये आणखी उपक्रम सुरु करण्याबाबत व मुले जास्तीत-जास्त वेळ विविध उपक्रमात गुंतुन राहतील असे विविध उपक्रम व खेळ संस्थेत घेण्याकरीता मध्यवर्ती कार्यालयामार्फत संस्थेस कळविले असुन संस्थेस मुलांच्या काळजी संरक्षणाकरिता अतिरिक्त मनुष्यबळ उपलब्ध करुन देण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भ‌ावत नाही.

---

**पनवेल (नवी मुंबई) मधील कळंबोली येथील रोडपाली बस स्थानकावरील अतिक्रमण हटविण्याबाबत**

**(४३) १४८१३ (१९-०९-२०२०). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल (नवी मुंबई) मधील कळंबोली येथील रोडपाली जवळ नव्याने बांधण्यात आलेले एनएमएमटी बस स्थानक अद्याप सुरू न झाल्याने तेथे खासगी वाहने व हातगाड्या पार्किग करण्यात येत असून या जागेवर अनेक नागरीकांनी अतिक्रमण केले आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार उक्त बस डेपो सुरू करून अतिक्रमण व पाकिंग हटविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२४-०२-२०२१) :** (१) हे खरे नाही.

(२)

• या ठिकाणी मोठी अतिक्रमणे नाहीत. छोट्या स्वरूपातील अतिक्रमणे ज्या ज्या वेळी निदर्शनास येतात त्यावेळी पनवेल महानगरपालिकेमार्फत कारवाई केली जाते.

• सदर जागा सिडकोच्या मालकीची असून अद्याप नवी मुंबई महानगरपालिका उपक्रमास हस्तांतरीत करण्यात आलेली नाही.

(३) प्रश्न उद्‌भ‍ावत नाही.

---

**मौजे पालशेत (ता. गुहागर, जि.रत्नागिरी) येथील लोकवस्तीच्या सुरक्षिततेसाठी संरक्षक भिंत बांधण्याबाबत**

**(४४) १५४७० (२३-११-२०२०). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे पालशेत (ता. गुहागर, जि.रत्नागिरी) बाजारपेठ येथे असलेल्या खारवी समाजाच्या लोकवस्तीमध्ये सातत्याने समुद्राच्या भरतीचे पाणी शिरत असल्यामुळे या लोकवस्तीला धोका निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर लोकवस्तीच्या सुरक्षिततेसाठी संरक्षक भिंत बांधण्यात यावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १४ ऑक्टोंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास पत्रान्वये मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र मेरिटाईम बोर्ड, मुंबई यांचेकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पालशेत येथील लोकवस्तीच्या सुरक्षिततेसाठी संरक्षक भिंत बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण (२४-०२-२०२१) :** (१) व (२) सदर निवेदन महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड, मुंबई यांचेकडून किनारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, मुंबई यांना दि.१.२.२०२१ रोजी प्राप्त झाले आहे.

(३) सदर काम निधी व नियतव्ययाच्या अधीन राहून हाती घेण्याचे नियोजन राहील.

(४) प्रश्न उद्‌भ्‍ावत नाही.

---

**शासन सेवा प्रवेशाची वयोमर्यादा एक वर्षाने वाढविण्याबाबत**

**(४५) १५८३८ (२७-११-२०२०). श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरोना या महामारीमुळे राज्याची आर्थिक स्थिती चांगली नसल्याने राज्यस्तरीय व जिल्हास्तरावरील शासकीय पदभरती करण्यात येवू नये असा शासन निर्णय वित्त विभागाने निर्गमित केला असल्याने ज्या उमेदवारांची वयोमर्यादा संपत आली आहे त्यांना यावर्षी पदभरती प्रक्रियेत सामील होता येणार नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यावर्षी पदभरती झाली असती तर काही उमेदवारांची निवड निश्चीतपणे झाली असती व त्यांना शासकीय सेवेची संधी मिळाली असती अशा पध्दतीने बेरोजगारांचे नुकसान होवू नये यादृष्टीने शासकीय सेवेसाठीची वयोमर्यादा एक वर्षाने वाढविण्याची आवश्यकता असल्याचे लेखी निवेदन विधानसभा सदस्य, बल्लारपूर यांनी दिनांक २४ सप्टेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री यांना दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने शासन सेवा प्रवेशाची वयोमर्यादा वाढविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उद्धव ठाकरे (१८-०२-२०२१) :** (१) होय,

कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे सन २०२०-२१ या वित्तीय वर्षात राज्याच्या कर व करेतर उत्पनातील अपेक्षित महसूली घट व त्याचे राज्याच्या अर्थव्यवस्थेवर होणारे परिणाम विचारात घेवून राज्य शासनाने काही वित्तीय उपाययोजना अंमलात आणल्या आहेत. या उपाययोजनांचाच एक भाग म्हणून सार्वजनिक आरोग्य विभाग आणि वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग वगळता उर्वरीत विभागांनी कोणत्याही प्रकारची नवीन पदभरती करू नये अशा सूचना राज्य शासनाच्या वित्त विभागाकडून देण्यात आल्या आहेत.

(२) होय.

(३) महाराष्ट्र लोकसेवा आयोग तसेच विविध विभाग / विभाग प्रमुखांनी स्थापन केलेल्या निवडसमित्यांकडून घेण्यात येणाऱ्या विविध स्पर्धा परिक्षांच्या माध्यमातून शासन सेवेतील प्रवेशाकरीता खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी ३८ वर्षे आणि मागासवर्गीय उमेदवारांसाठी ४३ वर्षे इतकी उच्चतम वयोमर्यादा विहित करण्यात आली आहे. ही वयोमर्यादा केंद्र शासनाच्या सेवेतील प्रवेशाकरीता विहित करण्यात आलेल्या कमाल वयोमर्यादेपेक्षा जास्त आहे. याशिवाय

करोना महामारीच्या पार्श्वभूमीवर केंद्र शासनाने देखील त्यांच्या सेवांमधील प्रवेशाकरीता वयोमर्यादा वाढविण्याचे आढळून येत नाही. सबब, राज्य शासनाच्या सेवेतील प्रवेशाकरीता उमेदवारांची कमाल वयोमर्यादा अतिरिक्त एका वर्षाने वाढविणे शक्य होत नसल्याचे मा.विधानसभा सदस्य, बल्लारपूर यांना अवगत करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भ‍ावत नाही.

---

**औरंगाबाद जिल्हयातील सिंचन प्रकल्पांची दुरुस्ती करण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(४६) १७३४२ (२५-११-२०२०). श्री.प्रदीप जैस्वाल (औरंगाबाद मध्य) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद जिल्हयात ४३ सिंचन तलाव, ६१२ पाझर तलाव, ४२ गाव तलाव, ५८५ कोल्हापूर बंधारे व ६०७ सिमेंट बंधारे बांधण्यात आलेले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्हा परिषद सिंचन विभागाने मुख्यमंत्री जलसंवर्धन योजनेंतर्गत जलसंधारण कामांचा दुरुस्ती आरखडा तयार केला असून यात १३८ प्रकल्पांच्या दुरुस्तीचा समावेश असून त्याकरिता सुमारे १६ कोटी रुपयांची आवश्यकता आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, औरंगाबाद जिल्हयातील १३८ सिंचन प्रकल्पांची दुरुस्ती करण्यासाठी तात्काळ निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शंकरराव गडाख (०९-०२-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.
जिल्हा परिषद जलसंधारण विभागामार्फत सदरिल कामे पूर्ण करण्यात आली आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) १३८ सिंचन प्रकल्पांपैकी प्राधान्यक्रम-१ ची जिल्हा
परिषद जलसंधारण विभागामार्फत सादर रु.८.८३ कोटी रुपयाची ६७ अंदाजपत्रकाची माहिती शासनाने निर्गमित केलेल्या प्रपत्रामध्ये प्रशासकीय मान्यतेस्तव अप्पर आयुक्त जलसंधारण आयुक्तालय औरंगाबाद यांना सादर करण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्भ‍ावत नाही.

---

**मौजे ताकबीड (ता.नायगाव (खै.), जि.नांदेड) येथील कोल्हापूरी बंधाऱ्याचे बांधकाम व नाला खोलीकरणाचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत**

**(४७) १९५२२ (२१-११-२०२०). श्री.राजेश पवार (नायगांव) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे ताकबीड (ता.नायगाव (खै.), जि.नांदेड) येथील कोल्हापुरी बंधाऱ्याचे बांधकाम व नाला खोलीकरणाचे काम निकृष्ट दर्जाचे झाले असुन सदरहू काम अपूर्ण असल्याचे माहे नोव्हेंबर,२०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कंत्राटदाराने सदर काम अपूर्ण व निकृष्ट दर्जाचे झाले असुन देखिल देयके अदा करण्यात आलेली आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार सदर बंधाऱ्याचे व नाला खोलीकरणाचे काम निकृष्ट दर्जाचे करणाऱ्या कंत्राटदारावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शंकरराव गडाख (०९-०२-२०२१) :** (१) व (२) हे खरे नाही.
मौजे ताकबीड ता. नायगाव जि. नांदेड येथील कोल्हापूरी बंधा-याचे पाया खोदकाम दिनांक १८/०२/२०२० रोजी सुरु करण्यात आले होते. परंतु नाल्यास सतत प्रवाह असल्यामुळे खोदकाम पुर्ण झाले नाही. त्यानंतर टाळेबंदी व पुढे पावसाळ्यामुळे पुढील काम होवू शकले नाही. पावसाळ्यात पार्श्ववहन होवू नये म्हणून केलेले खोदकाम देखील माती भराव करुन पुर्ववत करण्यात आले. त्यामुळे को.प. बंधा-याचे कोणतेही काम झाले नसल्यामुळे कंत्राटदारास या कामापोटी कोणतेही देयक अदा करण्यात आलेले नाही.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## उचंगी प्रकल्प (ता.आजरा,जि.कोल्हापूर) या प्रलंबित प्रकल्पास वाढीव दायित्वास मान्यता मिळण्याबाबत

**(४८) २०२७५ (१२-१२-२०२०). श्री.राजेश नरसिंगराव पाटील (चंदगड) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उचंगी प्रकल्पाचे (ता.आजरा, जि.कोल्हापूर) काम गेली २० वर्षे चालू असून घळभरणी व सांडव्याच्या कामाव्यतिरिक्त प्रकल्पाचे ८०% काम पूर्ण झाले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सुरवातीला काढलेल्या निविदेच्या किंमतीत काम करावे व उर्वरीत कामासाठी नवीन निविदा मागविण्यात याव्यात असे शासनाचे धोरण आहे परंतु शिल्लक घळभरणीचे व सांडव्याचे काम प्रकल्पाच्या दिरंगाईमुळे सुरुवातीच्या निविदेच्या किंमतीत पूर्ण होऊ शकत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार उचंगी प्रकल्पास वाढीव दायित्वास मान्यता मिळण्यासह प्रकल्पाचे अपूर्ण काम तात्काळ पूर्ण करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील (१७-०२-२०२१) :** (१) होय. प्रकल्पाचे धरणाचे काम घळभरणी वगळता तलांकापर्यंत पूर्ण झाले आहे. सदरचे मातीकाम एकूण ८५ टक्के पूर्ण झाले आहे. सांडव्याचे काम २५ टक्के पूर्ण झाले आहे व विमोचकाचे सरासरी ७५ टक्के काम पूर्ण झाले आहे.

(२) होय. प्रकल्प पूर्ण करणेच्या कामास झालेला विलंब हा मुख्यत्वे भूसंपादन, वनजमीन व प्रकल्पग्रस्तांच्या विरोधामुळे झालेला आहे. तसेच सांडवा व मुख्य धरणाच्या सविस्तर संकल्पनानुसार परिमाणामध्ये वाढ होऊन किमतीत वाढ झाली आहे. त्यामुळे मूळ निविदेच्या किमतीमध्ये प्रकल्पाचे काम पूर्ण होऊ शकत नाही.

(३) शासन निर्णय दिनांक २२/१२/२०१७ अन्वये प्रकल्पाच्या दायित्व मान्यतेबाबत निश्चित केलेली कार्यपद्धती ही PMKSY व BJSY अंतर्गत प्रकल्पास लागू आहे. तथापि इतर प्रकल्पाच्या वाढीव दायित्व मान्यतेबाबत यादी निश्चित करणेची कार्यवाही शासन स्तरावर विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्‌भ‌ावत नाही

---

**भिवंडी (जि.ठाणे) शहराचा विकास आराखडा पुन्हा नव्याने बनविण्याबाबत**

**(४९) २०२८२ (२५-१२-२०२०). श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी (जि.ठाणे) मधील नागरिकांच्या आणि शहराच्या विकासाच्या दृष्टीने शासनाने भिवंडी शहराचा विकास आराखडा (डेव्हलपमेंट प्लॅन) पुन्हा नव्याने बनविण्याबाबत स्थानिक वि.स.स यांनी दिनांक १२ नोव्हेंबर, २०२० रोजी वा त्या सुमारास शासनास निवेदन दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २००३ मध्ये भिवंडी शहरासाठी बनविण्यात आलेल्या विकास आराखड्याची मागील १७ वर्षांत ५% प्रमाणात देखील अंमलबजावणी झालेली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यामुळे स्थानिक नागरिक उद्याने, मैदाने, तरणतलाव, हॉल इत्यादी नागरी सुविधांपासून वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मुंबई शहराचा विकास आराखडा नुसार इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सेल्फ गव्हर्नन्स या संस्थेमार्फत शहर नियोजकांच्या (Urban Planners) मदतीने भिवंडी विकास आराखडा तयार करण्याबाबत शासन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१७-०२-२०२१) :** (१) हे खरे आहे.

यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दि.०७/१०/२०२० रोजी शासनास निवेदन दिलेले आहे.

(२) व (३) विकास आराखड्याची मागील १७ वर्षांत ५% प्रमाणात देखील अंमलबजावणी झालेली नाही अशी वस्तूस्थिती नाही. विकास आराखडयातील विकसित केलेल्या/ विकासाचे काम सुरु असलेल्या आरक्षणांमुळे उद्याने, मैदाने, स्टेडीयम, शाळा, वाचनालय, सभागृह, दवाखाना, कब्रस्तान इत्यादी नागरी सुविधा नागरीकांना उपलब्ध झाल्या आहेत.

(४) दिनांक २५/०१/२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये विकास योजना तयार करतांना/ मंजूर

विकास योजना सुधारीत करतांना भौगोलिक माहिती प्रणाली (GIS) या संगणक प्रणालीचा वापर करुन तयार करण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच नगर रचना अधिकारी यांच्या मदतीसाठी सुयोग्य संस्थेची नेमणूक करण्याची मुभा नियोजन प्राधिकरणास देण्यात आली आहे. सदर कामासाठी खाजगी संस्थेची नेमणूक करण्याचे महानगरपालिकेचे प्रयोजन असल्याचे भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेने दिनांक १५/१२/२०२० रोजीच्या पत्रान्वये शासनास कळविले आहे. तसेच सुधारीत विकास योजना तयार करण्यासाठी स्वतंत्र विकास योजना घटकांची नियुक्ती करण्याची विनंती महानगरपालिकेने शासनास केली असून त्यावर

शासनस्तरावर कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उदभवत नाही.

---

**कांदिवली (पू.) (मुंबई) येथील फिजीकल ट्रेनिंग इन्स्टीटयूट (पी.टी.आय) मधील बॉईज हॉस्टेल, कॅन्टीन व इतर इमारतींच्या देखभाल दुरुस्तीच्या कामामध्ये झालेला गैरव्यवहार**

**(५०) २०३०४ (२८-१२-२०२०). ॲड.राहुल नार्वेकर (कुलाबा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील बांधकाम (सा.बा.) उपविभाग, अंधेरी, मुंबई यांचे अधिपत्याखालील कांदिवली सेवा केंद्रातंर्गत फिजीकल ट्रेनिंग इन्स्टीट्युट (पी.टी.आय) कांदीवली (पूर्व) येथील बॉईज हॉस्टेल, कॅन्टीन व आवारातील इतर इमारतींच्या देखभाल दुरुस्तीच्या कामामध्ये शाखा अभियंता व उप अभियंता यांनी कंत्राटदारांशी संगनमत करुन केलेल्या लाखो रुपयांच्या गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबत मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, मुंबई यांच्याकडे दिनांक १२ ऑक्टोबर, २०२० रोजी वा त्या सुमारास निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने मुख्य अभियंता यांनी त्यांच्या दिनांक १४ ऑक्टोबर, २०२० रोजीच्या पत्रान्वये चौकशी करुन १५ दिवसात अहवाल सादर करण्याबाबत संबंधितांना आदेशित केले आहे, हे ही खरे आहे काय.
(३) असल्यास, मंजूर केलेली कामे न करता उक्त कामांची देयके कंत्राटदारांशी संगनमत करुन काढण्यात आल्याबाबत चौकशी करण्यासंदर्भातील निवेदन अपर मुख्य सचिव व सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग यांना देखील दिनांक १८ नोव्हेंबर, २०२० रोजी वा त्या सुमारास दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दोषी अधिकारी व कर्मचारी यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण (१२-०२-२०२१) :** (१), (२) व (३) होय, निवेदन प्राप्त झाले. आहे. त्यानुषंगाने मुख्य अभियंता, सा.बां. प्रादेशिक विभाग,मुंबई यांनी अधीक्षक अभियंता,दक्षता व गुण नियंत्रण मंडळ,कोंकण भवन,नवी मुंबई यांना चौकशी/तपासणी करुन अहवाल सादर करण्याचे निर्देश दिलेले आहेत.
(४) याबाबत अधीक्षक अभियंता, दक्षता व गुण नियंत्रण मंडळ,कोंकण भवन,नवी मुंबई यांच्याकडून चौकशी/तपासणी प्रगतीत आहे.
(५) प्रश्न उद्‌भ्‍ावत नाही.

---

**विधान भवन :** **राजेन्द्र भागवत**
**मुंबई.** **सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.